रायगड, सोमवार दि. ३ एप्रिल २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

परीक्षार्थ्यांना निकालाचे वेध

(संग्रहीत छायाचित्र)

पान ३ वर

लखनऊचा पहिला विजय

पान ८ वर

भाजपविरोधात 'वज्रमूठ'

संभाजीनगरच्या सभेत मविआचा हल्लाबोल

। संभाजीनगर । प्रतिनिधी ।

सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर तपास यंत्रणांचा गैरवापर करुन महाराष्ट्रात सत्तेवर आलेल्या शिंदे, फडणवीस सरकारला आगामी सर्वच निवडणुकांमध्ये वज्रमूठ दाखविण्याचा निर्धार महाविकास आघाडीच्यावतीने रविवारी (२ एप्रिल) संभाजीनगर येथे करण्यात आला. भ्रष्ट मार्गाने सत्तेवर आलेले हे सरकार हद्दपार करण्यासाठी आम्ही वज्रमूठ बांधली असल्याचे मविआ नेत्यांनी जाहीर केले.

शिंदे, भाजप सरकारच्या विरोधात महाविकास आघाडीने जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे. याचाच एक भाग म्हणून आता राज्यभर जाहीर सभा घेतल्या जात आहे. रविवारी संभाजीनगरच्या सभेला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, धनंजय मुंडे, अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे आदींसह तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते.

हिंदूंचा आक्रोश दुर्दैवी-ठाकरे

नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान असताना भाजपला हिंदू आक्रोश करावा लागतोय हे दुर्दैवी असल्याचा टोला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी भाजपला लगावला. सध्या सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली आहे. अवश्य काढा. सध्या अनेक ठिकाणी हिंदु जनआक्रोश यात्रा काढण्यात येतोय. मुंबईतही हा मोर्चा निघाला. शिवसेना भवनासमोर हा मोर्चा आला होता. सध्या देशाचे पंतप्रधान •> पान २ वर

'सावरकरांचा अपमान नको'

। ठाणे । प्रतिनिधी । स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करणाऱ्या लोकांच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्यांना राज्याची जनता उत्तर देईल, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांच्या शिवसेनेवर केली आहे. ठाण्यामध्ये रविवारी (२ एप्रिल) आयोजित करण्यात आलेल्या सावरकर गौरवयात्रेच्या निमित्ताने त्यांनी ठाकरेंसह काँग्रेस, राष्ट्रवादीवर निशाणा साधला. शिंदे म्हणाले की, महाविकास आघाडीची सभा ज्या शहरात सभा होत आहे. त्याचं नाव छत्रपती संभाजीनगर करण्याची घोषणा बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. त्याच संभाजीनगरमध्ये महाविकास आघाडीकडून सभा घेण्याचं काम सुरु आहे. •> पान २ वर

प्रकल्पग्रस्त एकवटले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नोकरीच्या अपेक्षेपोटी प्रकल्पासाठी सुपिक जमीन शेतकऱ्यांनी दिल्या. शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेतले जाईल. रोजगार दिला जाईल अशा प्रकारचे आमिष दाखवून वेलस्पन मॅक्सस्टील कंपनीच्या माध्यमातून जमिनी कवडीमोल भावाने घेतल्या. परंतु अनेक वर्षे उलटूनही प्रकल्पग्रस्त नोकरी, रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. रोजगाराचे आमिष दाखवून जमिनी बळकावल्या असल्याचा आरोप करीत संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी संपादित केलेल्या जमीनी परत करण्याची मागणी केली आहे. याबाबत अलिबागचे उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांना निवेदन दिले आहे. प्रकल्पग्रस्त शेतकरी, व कंपनी व्यवस्थापन यांची संयुक्त बैठक बोलावून न्यायीक मार्ग काढावा अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

१९८९-९० मध्ये या जमिनी प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी दिल्या. संपादीत केलेल्या जमिनीपैकी ६० टक्के जमिनींमध्ये प्रकल्प उभा केला. मात्र उर्वरित ४० टक्के जमीन आजपर्यंत पडीक ठेवण्यात आली आहे. त्यानंतर २००९-२०१० मध्ये संबंधित स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी वेलस्पन मॅक्सस्टील कंपनीच्या माध्यमातून संपादित करण्यात आल्या.

▶▶ 'रोजगाराच्या आमिषाने जमिनींवर डल्ला'

▶▶ चेहेर, मिठेखार, निडी वाघुळवाडी, मुरुडमधील शेतकऱ्यांचा आरोप

> रोजगार देण्याच्या नावाखाली कंपनीने जमिनी संपादित केल्या. मात्र अद्यापही त्याठिकाणी प्रकल्प उभारला नाही. शेतकऱ्यांची मोठी फसवणूक कंपनी प्रशासन करीत आहेत. ३२ वर्षात कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे. आता शेतकरी खपवून घेणार नाही.
> – ॲड. विनायक शेडगे, कायदेशीर सल्लागार

जमिनींचा योग्य मोबदला दिला जाईल. ३६ महिन्यांत प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिला जाईल. जोपर्यंत प्रकल्प येत नाही. तो पर्यंत मानधन देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्यात येईल. नव्याने संपादित •> पान २ वर

तीन दशके फसवणूकच

मागील ३२ वर्षापासून कंपनी याकडे दुर्लक्ष करीत शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे. रोजगार मिळेल. नोकरी मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या. मात्र आज येथील शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. प्रकल्पग्रस्तांची मुले उच्च शिक्षित असूनदेखील त्यांना रोजगार, नोकरी नाही, त्यामुळे उपाससमारीची वेळ आली आहे. चेहेर, मिठेखार, वाघुळवाडी, नवीन चेहेर, साळाव निडी परिसरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यांनी न्यायासाठी महसूल प्रशासनाकडे धाव घेतली आहे.

वेधक

भाजप नेत्याची गोळ्या झाडून हत्या

कोलकाता : पश्चिम बंगालमधील वर्धमान येथील शक्तीग्रहात भाजप नेते राजू झा यांची काही अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली. दुर्गापूर येथील व्यापारी राजू झा असे मृताचे नाव आहे. ते काही सहकाऱ्यांसोबत कोलकात्याला जात होते दरम्यान, शक्तीगढ परिसरातील एका मिठाईच्या दुकानाबाहेर अज्ञातांनी त्यांच्यावर हल्ला केला. कारमध्ये राजू झा यांच्यासह तीन जण प्रवास करत होते. हत्येचं कारण अजून समजू शकला नाही. पुढील तपास सुरू आहे. राजू झा यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले. तर जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू होते.

उरण तलावात तरुणीचा मृतदेह

उरण : उरण भवरा येथील तलावात एका तरुणीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी सिडको अग्निशामक दलाच्या मदतीने मृतदेह तलावाच्या बाहेर काढला. तरुणीचे नाव मनाली दत्तात्रेय जाधव (वय ३०) असे आहे. ती भवरा येथेच राहते. तिने आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज असला तरी परिसरात मात्र चर्चेला उधाण आले आहे. या घटनेचा अधिक तपास हवालदार एस.आर.वसावे व त्यांचे सहकारी करीत आहेत.

देशात सर्वात मोठी डेटा चोरी

नवी दिल्ली : देशातील सर्वांत मोठी डेटा चोरी झाली आहे. तब्बल ६६.९ कोटी लोकांचा डेटा चोरीला गेला असून यामध्ये कोणाचा पॅन तपशील, कोणाच्या नेटफ्लिक्स खात्याची माहिती, कुणाचा पेटीएम क्रमांक, कुणाचा वैयक्तिक डेटा, अशी पद्धतीने डेटा चोरीला गेला आहे. या प्रकरणात हैदराबाद, तेलंगणाच्या सायबराबाद पोलिसांनी डेटा चोरीप्रकरणी एका व्यक्तीला अटक केली आहे.

रामराज परिसरातील

आदिवासी वाड्यांचा विकास

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मोरोंडे ते बारशेत आदिवासी वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. शेकापचे सरचिटणीस आ.जयंत पाटील यांनी पुढाकार घेत डोंगरभागात राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी या रस्त्याच्या कामांसाठी निधीची मागणी जिल्हा परिषदेकडे केली आहे. त्याला जिल्हा परिषदेकडून हिरवा कंदील मिळाला असून जिल्हाधिकारी कार्यालयात मान्यता व निधी मजूरीसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे लवकरच रामराज परिसरातील आदिवासी वाड्यांचा विकास साधण्यास मदत होणार आहे.

|| आ.जयंत पाटील यांच्या प्रयत्नांना यश

|| रस्त्याच्या कामांसाठी निधीची मागणी

> शेकाप नेते आ.जयंत पाटील यांच्या प्रयत्नाने रस्त्यांच्या कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आदिवासीवाड्यांमध्ये नागरिकांना या रस्त्याचा चांगला फायदा होणार आहे.
> - मधुकर ढेबे, माजी सरपंच, बोरघर ग्रामपंचायत

रामराज परिसरातील आदिवासी वाड्यांवरील सद्यस्थितीत रस्ता कच्चा आहे. दळणवळणाच्यादृष्टीने तसेच शाळकरी मुले, ग्रामस्थांना हा रस्ता वैद्यकीय उपचाराकामी अत्यंत गैरसोयीचे आहे. ही बाब शेकाप आ. पाटील यांच्या निदर्शनास आली. डोंगर भागात राहणाऱ्या आदिवासी वाड्यांमधील समाजाला मुलभुत सुविधा मिळावी यासाठी बांधिलकी जपत मोरोंडे ते सतेवाडी, आदिवासीवाडी रस्ता, मोरांडे ते सतेवाडी बारशेत आदिवासीवाडी रस्ता करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे मागणी केली. या मागणीची दखल घेत रायगड जिल्हा परिषदेने या कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मान्यता व निधी मंजुरीसाठी पाठविला आहे. लवकरच या भागातील रस्त्याचे काम पुर्ण होण्याची शक्यता आहे. यापुर्वी देखील त्यांनी डोंगरभागात राहणाऱ्या सत्तेवाडी, होंडावाडीमध्ये विजेची सेवा उपलब्ध करण्याची मागणी महावितरण विभागाकडे केली होती.

गडकरी-पवार भेटीमागे दडलंय काय?

। नागपूर । प्रतिनिधी।

अवघ्या आठ तासात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी दुसऱ्यांदा एकत्रित आल्यानं विविध चर्चांना उधाण आले आहे.

नागपुरातील फुटाळा तलावावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून लाईट अँड लेझर शो तयार करण्यात आला आहे. हा शो पाहण्यासाठी अध्यक्ष शरद पवार आले होते. यावेळी नितीन गडकरी हेदेखील उपस्थित होते.त्यानंतर रविवारी ते पुन्हा एकत्र भेटले.

पोलीस परीक्षेसाठी लाच घेणाऱ्या पोलिसास अटक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड पोलीस दलाच्या पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेत मदत करण्यासाठी एक लाख रुपये घेणाऱ्या नवी मुंबईच्या पोलीस हवालदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना रोहा परिसरात घडली असून या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पोलीस हवालदार पी.बी. मोकल असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. तो नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी वडखळ व रोहा येथे रायगड पोलीस दलामध्ये भरती करण्याचे आमिष दाखवून एका उमेदवाराकडून ७ लाख रूपयांची मागणी केली होती. त्यावेळी फिर्यादी याने पैसे देण्यास मान्य केले होते त्याप्रमाणे फिर्यादी यांचा भाऊ व पुतण्या आणि मुलगा हे आरोपीला भेटण्यासाठी वडखळ ता. पेण येथे गेले असता आरोपीने फिर्यादीचे मुलाला रायगड पोलीस भरती करून देण्याचे आमिष दाखवून यापूर्वी मागणी केलेले ७ लाख •> पान २ वर

बहावा ला बहर...

■ वसंत ऋतु मध्ये अनेक झाडांना बहर येत असतो. अलिबाग-रोहा मार्गावर खानाव ते वावे दरम्यान रस्त्यालगत असलेल्या बहावाच्या झाडांना बहर आला असून त्यावर फुललेली पिवळी फुलं या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांना मोहित करीत आहेत. बहावा औषधी गुणकारी देखील आहे.

मुख्यमंत्री शिंदे ९ एप्रिलला अयोध्येला

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अयोध्या दौऱ्याची घोषणा केली आहे. येत्या ९ एप्रिलला अयोध्या दौरा करून प्रभू रामचंद्राचे दर्शन घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेन पक्षाचे आमदार, खासदार, जिल्हाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांसह अयोध्या दौरा होणार आहे. अयोध्या आमच्यासाठी भावनेचा आणि श्रद्धेचा विषय आहे. आम्ही या विषयाकडे राजकारण म्हणून पाहिलं नाही आणि पाहणार सुद्धा नाही. दुसऱ्यांदा आम्ही बोलू इच्छित नाही. शरयू नदीवर आरती करणार आहोत. अयोध्येतील राम मंदिराचे बाळासाहेबांचे स्वप्न होते, ते पंतप्रधान मोदी पूर्ण करत आहेत.

शिवकरमधील हत्या कोंबडी चोरांकडून

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील शिवकर येथे एका अल्पवयीन तरुणाची कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना घडली होती. पहाटेच्या सुमारास झालेल्या या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली होती. गुन्हे शाखा कक्ष तीनच्या पथकाने या अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचा गुन्हयाचा अखेर उलगडा केला असून कोंबडी चोरीसाठी आलेल्या आरोपींना विनयने चोरी करताना पाहिल्यामुळे त्याची हत्या केल्याचे समोर आले आहे.

या गुन्ह्यातील आरोपी दिनेशकुमार सरोज, वीरेंद्र कुमार सरोज, चंद्रशेखर लालजी हे तिन्ही आरोपी गुन्ह्याच्या दिवशी पहाटेच्या सुमारास गावात कोंबड्या चोरण्यासाठी आले होते. यावेळी ते विनयच्या घरात मोबाईल चोरण्यासाठी आले असता विनयला जाग आली. विनयला पाहून आरोपी पळू लागल्याने विनयने देखील त्यांच्या पाठोपाठ घरातून बाहेर पडत चोरांचा पाठलाग सुरू केला. यावेळी या तिन्ही चोरट्यांनी विनयला पकडले आणि पोटात चाकूने वार करून जखमी केले त्यानंतर कुऱ्हाडीने शरीरावर वार केला. यामध्ये विनयचा जागीच मृत्यू झाला. थोड्या वेळानंतर वडील आणि बहिणीला जाग आल्यानंतर त्यांनी मुलाचा शोध घेण्यास सुरू केला. यावेळी त्यांना तलावाच्या गणपती घाटाजवळ विनयचा मृतदेह सापडला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच घटनास्थळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांची वेगळी पथके तयार करीत आरोपीच्या शोधात परिसर पिंजून काढत होते. दरम्यान गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ कोळेकर व त्यांच्या पथकाने समांतर तपास सुरु करून •> पान २ वर

विकेन्डला मुरुड फुलले

म्हावऱ्याअभावी पर्यटक नाराज

। सुधीर नाझरे ।
। मुरुड जंजिरा ।

मुरुड परिसरातील पर्यटन पुन्हा बहरु लागले आहे. सध्या सकाळी थंडी तर दुपारी गरम असे वातावरण असल्याने विकेन्डला मुरुडच्या किनाऱ्यावर येणे पसंत करत आहेत. परंतु मासळी बाजारातून मासळी गायब झाल्याने पर्यटक नाराज असल्याचे दिसत आहे.

समुद्रकिनारी असलेली हॉटेल उन्हाळी सुट्टीसाठी सज्ज झालीत. सर्व हॉटेल रंगरंगोटी, विविध रंगाची रोषणाई, नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टॉल्स, समुद्रावर घोडेसवारी, मोटारबाईक, पाणीपुरी, भेळ पुरी अशा विविध स्टॉल्सनी किनारा बहरला आहे.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेली विश्रामधाम बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ पर्यटकांना होते. पालिकेचे कर्मचारी समुद्रकिनारी दिवसातून ३ वेळा स्वच्छता करताना दिसत आहेत.

गारंबी धरण, कुडे मांदाड लेणी, खोकरी दत्तमंदिर या पर्यटन स्थळावर स्वछता करून खाण्यापिण्याचे स्टॉल करण्यात आलेत. सलग सुट्टी असल्याने पर्यटकांसाठी मुरुड तालुका सज्ज आहे.

> गेली २ वर्ष कोरोनामुळे हॉटेल व्यवसाय डबघाईला आला होता. या वर्षी उन्हाळी सुट्टीचे बुकिंग चांगली झाली आहे. पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात मुरुडला यावे आम्ही त्यांना उत्तम सेवा देऊ व हॉटेल भाडे योग्य दरात घेऊ.
> - किशोर धमसकर (हॉटेल व्यावसायिक)

> उन्हाळी पर्यटनासाठी मुरुड सज्ज झाले आहे. पिण्याचे पाणी, शहरातील रस्ते व समुद्रकिनाऱ्याच्या स्वच्छतेकडे लक्ष दिल्याने पर्यटकांना त्रास होणार नाही. पर्यटकांनी समुद्रात जाताना भरती ओहोटी याचे भान ठेऊन सुरक्षित आनंद लुटावा.
> - पंकज भुसे, मुख्याधिकारी

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ एप्रिल

१) श्री. अरविंद कोहीरकर मेघा टॉकीजसमोर, अलिबाग ०३-०४-१९४३

२) श्री. प्रसाद पाटील चेंढरे, अलिबाग ०३-०४-१९५८

वेधक

शरद काळे यांचे निधन

मुंबई : मुंबई पोर्ट ट्रस्टचे माजी अध्यक्ष, मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त, महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव, यशवंतराव चव्हाण यांचे खाजगी सचिव आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे माजी जनरल सेक्रेटरी शरद काळे (वय ८३) यांचे निधन झाले. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी असताना शरद काळे यांची १९९६ - ९७ च्या दरम्यान १४ महिन्यासाठी मुंबई बंदरात अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांच्या निधनाबद्दल ज्येष्ठ कामगार नेते ॲड. एस. के. शेट्ये व सुधाकर अपराज ट्रस्ट युनियनच्यावतीने आदरांजली वाहिली.

रखुमाबाई पाटील यांचे निधन

पाताळगंगा : आंबिवली येथील रखुमाबाई वामन पाटील (वय ७६) यांचे निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी ६ एप्रिल रोजी श्री क्षेत्र धाकटी पंढरी साजगांव तर उत्तरकार्य सोमवारी (१० एप्रिल) आंबिवली (माजगांव) त्यांच्या निवास स्थानी होणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, भाऊ बहिणी, सुना, नातवंडे, पंतवडे, जावई, असा मोठा परिवार आहे.

पेण अर्बन बँक प्रकरण

बारा वर्षात अवघ्या १८५ कोटींची कर्जवसुली

६११ कोटींच्या वसुलीचे गौडबंगाल

ठेविदार अजूनही वाऱ्यावर

। पेण । मुस्कान खान ।

७५ वर्षाची परंपरा असलेल्या अर्बन बँक घोटाळ्याला एक तप होऊन गेले आहे. या बारा वर्षात बँकेकडून आजतागायत १८४.७१ कोटींची वसुली झाली आहे. तर ६११,१५ कोटी रूपये वसुली होणे बाकी आहे, यातील बोगस प्रकरणाचा थांगपत्ता लागत नाही त्यामुळे ठेविदारांची देण काही परत देता येत नाही, अशी सर्व स्थिती असल्याची माहिती बँकेच्या प्रशासकांकडून प्राप्त झाली आहे.

१८ शाखा असणाऱ्या बँकेला रातोरात टाळे बसले. यामुळे सहकार क्षेत्राला मोठा हादरा बसला होता. ठेविदार व खातेदार आपले पैसे कधी मिळतील या आशेवर अजुनही आहेत. तेव्हापासून आजतागायत दोन लोकसभा, दोन विधानसभा, दोन वेळा नगरपालिका अशा निवडणुका झाल्या. प्रत्येक वेळी राजकीय मंडळीने आपली पोळी भाजण्यासाठी आश्वासनाची खैरात केली. शरद पवार, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस यांनी बँक सुरू करण्यासाठी आश्वासन दिले. परंतु ते आश्वासनच राहिले. माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी देखील आश्वासन दिले त्यांना देखील पूर्तता करता आली नाही. आज चातक पक्ष्याप्रमाणे ठेविदार बँकेच्या मालमत्तेची कधी विक्री होते व कधी आम्हाला आमच्या हक्काचे पैसे परत मिळतात याकडे डोळे लावून बसले आहेत.

राज्यातील चार-चार मुख्यमंत्र्यांनी अर्बन बॅक सुरू होण्याचे गाजर दाखवले. परंतु प्रत्यक्षात काहीच झाले नाही. संचालकांना अटक झाली. यातील काही संचालकांनी विनाकारण बॅकेचा त्रास झाल्याने हाय खाल्ली. त्या त्रासातच काही जणांना आपला अनमोल जीव गमवावा लागला. तर काहीजण आज पेणच्या राजकारणात सक्रिय झालेल पहायला मिळतात. सौ चुहे खाके बिल्ली चली हज को या थाटात संचालक मंडळ वावरत आहेत. मात्र या सर्वात आजही ठेविदार अजून वाऱ्यावर आहेत.

३ सप्टेंबर १९३५ साली स्थापना झालेल्या पेण अर्बन बँकेचा सन २३ सप्टेंबर २०१० साली जेव्हा बँक आर्थिक घोटाळ्यात सापडले असल्याचे उघडकीस आले तेव्हा प्रथमदर्शनी ११०० कोटींचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. परंतु जसजसे एक-एक पान उघडत गेले तसतसा घोटाळ्यांचा आकडा निश्चित होत गेला. तो नंतर ७९५.८६ कोटी रूपयांचा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ चे कलम ३५ अ अन्वये आर्थिक निर्बध लागू झाले. त्यानंतर २४ सप्टेंबर २०१० रोजी तातडीने पेण अर्बन बँकेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली. मात्र या बँकेच्या भ्रष्टाचाराच्या घटनेनंतर आजपर्यंत १३ वर्षे झाली पण बँक सुरू झाली नाहीच. तसेच बँकेच्या खातेदारांना व ठेवीदारांना त्यांची भरलेली रक्कमही मिळाली नाही.

बारा कोटींच्या ठेवी परत

१ एप्रिल २०२२ ते २८ फेब्रुवारी २०२३ अखेर पेण अर्बन बँकेने कर्जदारांना एक रक्कमी परतफेड योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या २२७ अर्जातून २.७४ कोटी रूपयांची वसुली केली आहे. बँकेतील ठेवीदारांपैकी उच्च न्यायालयाच्या २० ऑगस्ट २०१५ च्या आदेशानुसार आजपर्यंत १० हजार रुपयांपर्यंत रक्कम असणाऱ्या सर्व शाखांमधून १३ हजार ७२३ ठेविदारांना ४ कोटी ९५ लाख ८ हजार २११ रूपये तर २५ हजार रूपयांपर्यंतच्या ९ हजार ६३२ ठेवीदरांना १२ कोटी १६ लाख ८० हजार ३६० रुपयांपर्यंत रक्कमा परत मिळाल्या आहेत.

वसुली संथगतीने

बँकेच्या कागदोपत्री ७९५.८६ कोटी रूपयांचे कर्ज देण्यात आले आहे असे दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र ४९.९६ कोटी रुपयांचे कागदोपत्री कर्जदार असून बोगस कर्जदार ज्यांचे कोणतेही कागदपत्र नाहीत असे ७४५.९० कोटी रुपयांचे खोटे कर्जदारांच्या नावे कर्ज वाटप झाले आहे. तर बँकेची कर्ज वसुली मोहीम अतिशय संथगतीने सुरू असून आजतागायत १८४.७१ कोटींचीच वसूली झाली आहे. तर ६११.१५ कोटी रूपये वसूली होणे बाकी आहे.

कामगारांच्या पगारवाढीसाठी श्रमिक संघ कटिबद्ध : रानवडे

। नागोठणे । वार्ताहर ।

भारतीय श्रमिक शक्ती पगारवाढीसह अन्य महत्वाच्या मागण्यांसह अन्य सुविधा मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. आधीचा करार संपण्यापूर्वी तीन महिने आधी व्यवस्थापनाला मागणीपत्र देऊन वाटाघाटी करून लवकरात लवकर करार पूर्ण करून वाढीव पहिला पगार देण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही संघटनेच्या केंद्रीय समितीचे कार्याध्यक्ष कामगार नेते दीपक रानवडे यांनी दिली.

नागोठण्यातील इंद्रप्रस्थ हॉटेलच्या सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याचवेळी नागोठणे रिलायन्स युनिटच्या रिक्त झालेल्या अध्यक्षपदी संजय काकडे यांची निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड. नितीन शिवकर, अशोक भोय, प्रमोद मोरे, चंद्रकांत अडसुळे, प्रकाश मोरे, प्रवीण दबडे, मनोज पेढवी, किशोर शिर्के, सुरेश गायकर, शांताराम भोई, महेश धोत्रे, पंडित तुपकर, विनोद गोरे, दिनेश शिर्के, सुरेश कुथे, असलम चोगले आदींसह सल्लागार मारुती दांडेकर, सुभाष खराडे, ॲड. महेश पवार व कार्यकारिणी समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

स्त्री ज्योती सन्मान सोहळा

। रसायनी । वार्ताहर ।

हार्टफुलनेस लोकप्रिय वेलनेस इन्स्टिट्यूट आणि एनएमएमसी यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार सोहळा मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. निवेदिता श्रेयांस, सोमनाथ पोटरे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते; श्रीराम पवार, मिताली संचेती, सहाय्यक आयुक्त आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आरोग्य व स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांना चषक, प्रमाणपत्रे आणि रोख पारितोषिक वितरणासह भव्य पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

बेणसेत सोंगी भजन, भारुडातून प्रबोधन

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

बेणसे गावात श्री हनुमान मंदिरात श्री सत्यनायणाच्या पूजा निमित्ताने श्री बाबुजी सोंगी भारूड (खालापूर चिलठण) येथील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गायक भावू गायकर व मंडळाने या कार्यक्रमात प्रबोधन व विविध वेषभूषा साकारून मनोरंजन करण्यात आले. भारूड पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो नागरिक, महिला, पुरुषांनी मोठी गर्दी केली होती.

साधूराम खंडू कुथे व राजेश गोविंद गोरे यांचे महत्वपूर्ण भारुड आयोजनात विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमात छ. शिवाजी महाराज यांच्या शौर्य व पराक्रमाची गौरव गाथा दाखविणारे नाट्य सादर करण्यात आले. तसेच गणेश पूजन, शंकर पार्वती, कृष्ण गौलन, राम -लक्ष्मण -सीता - हनुमान, दादला नको ग बाई, देवी दर्शन, वारीक वारीक, होड़ी, देवारा, वेडी, नवरा बायको, नंदी बैल, विठ्ठल जनाई आदी वेगवेगळे कार्यक्रम पार पडले. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय व मंगलमय झाले होते. यावेळी कलाकार व भजनी मंडळी यांना उपस्थितांकडून भरघोस रोख बक्षीस मिळाली.

कार्यक्रम पाहण्यासाठी सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाखाली बेणसे येथील महिला व तरुण मंडळाने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

जिल्हा परीक्षा केंद्रामुळे विद्यार्थ्यांचे होणार 'कल्याण'

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील जिल्हा स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका ही नूतन वास्तू दिमाखात उभी राहिली आहे. या नवीन वास्तूचे उद्घाटन सोमवारी (३ एप्रिल) सकाळी ११ वाजता पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तत्कालीन जिल्हाधिकारी आणि सध्याचे विभागीय कोकण आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यात सर्व तालुक्यांमधून जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता गरुडझेप स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यात आले होते. या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मुलांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, ऑनलाईन मार्गदर्शन तसेच स्पर्धा परीक्षेची पुस्तके विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली होती. या हेतूने तालुक्याच्या ठिकाणी जिल्हा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र व अभ्यासिका उभे करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

अलिबागमध्ये उभारण्यात आलेल्या या जिल्हा स्पर्धा केंद्र आणि अभ्यासिका वास्तुने स्पर्धा परीक्षेसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कल्याण होणार हे नक्की.

आज पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

उरण येथे काँग्रेसची बैठक

। चिरनेर । वार्ताहर ।

राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ मोदी सरकारचा निषेध करण्याचा निर्धार उरण काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. यासाठी तालुका काँग्रेसने उरण येथे पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेला तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, किरीट पाटील, प्रकाश पाटील, सदानंद पाटील, अफशा मुकरी, मार्तंड नाखवा तसेच काँग्रेसचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपतर्फे लोकशाहीचा खून होत असून आम्ही काँग्रेस नेत्यांचा अपमान खपवून घेणार नाही असे परखड मत इंटकचे रायगड जिल्हाध्यक्ष किरीट पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे यांनीही भाजप व केंद्र सरकारचा निषेध केला.

मैत्री कट्टातर्फे विहिरीची साफसफाई

। उरण । वार्ताहर ।

पिरकोन गावाची मोठी विहीर नावाने सुप्रसिद्ध असलेली मोठी विहीर अर्थात मोठी बाव आणि परिसराची साफसफाई फणसवाडी मैत्री कट्टा परिवार पिरकोन यांच्या श्रमदानातून करण्यात आली.

सूर्यकांत गावंड, विलास गावंड, मंगेश म्हात्रे, राजा जोशी, प्रमोद जोशीं, प्रवीण जोशी,अभि पाटील, बाबू पाटील, विलास पाटील, केतन गावंड, सूरज घरत,प्रशांत गावंड, यतीश गावंड, प्रतीक घरत, आणि विनायक गावंड आदी मैत्री कट्टा फणसवाडीचे पदाधिकारी या मोहिमेत सहभागी झालेले होते.

पुनाडेमध्ये गुणवंतांचा गौरव

उरण : पुनाडे गावातील १० वी आणि १२ वीमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष यश मिळविले त्यांच्या गुणांचे कौतुक करून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन रायगडभूषण प्रा.एल. बी.यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी प्राचार्य ए.डी.पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, मुख्याध्यापिका सुजाता बल्लाळ, भारती म्हात्रे, सरपंच निलेश कातकरी, राजेश पाटील, सदस्या उमाताई कातकरी, संजना पाटील, ना. क. पाटील, प्रताप पाटील,अनिरुद्ध ठाकूर, लक्ष्मण पाटील इ. ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पाली तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नम्बुरी कंडतिल दिलीप यांचेकडून कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मिळकत परिशिष्ठ

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.प्रति	आकार रु.पै.
४०	३अ	१.७२.३०	०.९७

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनी यांचा बोजा, ताबेकब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, लीडडीड, वारस हक्क, वहिवाट हक्क तसेच अन्य प्रकारचे हक्कहितसंबंध अथवा इतर कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्ती/संस्था/कंपनी/अधिकृत प्रतिनिधी यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहित मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पत्ताः
१०३,पहिला मजला, पांडुरंग धाम
रेल्वे गेट जवळ, नेरळ, पुर्व, ता.कर्जत
जि.रायगड मो.नं.७७९८४३३८८८/९९२२११०६८७

सही/-
ॲड.कैलास अनंत बासरे

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वर्णे ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी तिचे विद्यमान मालक श्री.गणेश यशवंत देशमुख यांचे कडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
२९	११	०.११.२०	१.१२

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार, विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०३/०४/२०२३

ॲड.प्रदिप मोतीराम सुर्वे
ए २०२ स्वप्ननगरी, को.ऑप.हौ.
सोसासटी, मुद्रे खुर्द कर्जत, रायगड
फोन नं.२२०११६/९८५०१३५६५९

पान १ वरुन

सभेत मविआचा हल्लाबोल

हिंदू आहेत. तरी तुम्हाला हिंदू जनआक्रोश मोर्चा का काढावा लागतो, असा प्रश्नही ठाकरे यांनी उपस्थित केला.

आपण काही करायचं नाही, नुसतं कोंबडं झुंजवत बसायचं, यांनीच दंगली घडविल्या या आधीही मी संभाजीनगरला आलोय, याच शहरात १९८८ साली महापालिका शिवसेनेच्या ताब्यात आली आणि शिवसेनाप्रमुखांनी या शहराचं नाव बदललं, संभाजीनगर. गेली २५ वर्षे आपण भ्रमात होतो, भाजपसोबत आपली युती होती. पण औरंगाबादचं संभाजीनगर नामांतर झालं नव्हतं. पण महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आलं आणि भाजपला जे जमलं नाही ते आम्ही करुन दाखवलं. करायचं काय नाही, नुसतं कोंबडं झुंजवत बसायचं ही भाजपची खेळी. दंगली घडवल्या जातात, त्यामुळे निवडणुका जवळ आल्याचं समजू घ्या असं उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, आपण छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचं नाव घेतो आणि पाठीत वार करतो? बरं ठीक आहे. शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी सत्तेसाठी एकत्र आलो होतो. हो आलो होतो. पण आता सत्ता गेल्यानंतरही आम्ही एकत्र आहोत. उलट आता आम्ही अधिक घट्ट आहोत. असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. मध्यंतरी अमित शाह पुण्यात येऊन गेले. त्यांनी माझ्यावर आरोप केले. मी सत्तेसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे तळवे चाटले, असं ते म्हणाले. मला शिवसेना प्रमुखांची भाषा येत नाही, असं नाहीये. पण मला आवरावं लागतं. काही शब्द, भाषा त्यांनाच (बाळासाहेब ठाकरे) शोभणारी आहे. मला ती भाषा शोभणारी नाही. पण मी त्यांना (अमित शाह) फक्त एवढंच म्हणालो की, आम्ही सत्तेसाठी काँग्रेस-राष्ट्रवादीचे तळवे चाटत होतो. तर तुम्ही सत्तेसाठी मिंध्यांचं काय चाटत आहात? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला.

बिहारमध्ये आधी नितीशकुमार आणि लालू प्रसाद यादव यांचं सरकार होतं. आता तेच सरकार पुन्हा स्थापन झालंय. चांगली चाललेली सरकारं फोडायची, हा किती भयानक प्रकार आहे. पण त्यावेळी नितीशकुमार आणि लालू प्रसाद यादव यांचं सरकार पाडून तुम्ही नितीशकुमार यांचं काय चाटत होतात? हा माझा सवाल आहे. आता तुम्ही संगमांसोबत सत्तेत आहात. पण त्याच संगमांवर तुम्ही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते. मग संगमांनी हिसका दाखवल्यानंतर आता तुम्ही संगमांचं काय चाटत आहात? असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

सावरकरांना भारतरत्न द्या -पवार

आम्ही वज्रमुठ सभा आयोजित केली म्हणून सत्ताधाऱ्यांना गौरवयात्रा काढायचं सुचतंय. तुमच्यात धमक असेल, खरंच सावरकरांबद्दल तुम्हाला आदर-अभिमान असेल तर ताबडतोब सावरकरांना भारतरत्न देऊन दाखवा. तुमच्यात आहे का हिंमत? असा सवाल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला. फक्त महागाई, बेरोजगारीवरून दुसरीकडे लक्ष जाण्यासाठी हे चाललंय. संभाजीनगरमध्ये हिंसक घटना घडण्याचं काय कारण होतं? मविआची सभा होऊ नये म्हणून? ही कुठली लोकशाही? अशी विचारणाही त्यांनी केली.

उद्धव ठाकरेंच्या काळात दीड लाख लोक कामाला लागतील असे उद्योग इथे येत होते. यांचा पायगुण चांगला नाही. हे आल्यानंतर सगळे उद्योग परराज्यात गेले. दोष द्यायचा कुणाला? ७५ हजार नोकऱ्या आणणार म्हणाले, पण कधी भरणार? तरुणांच्या तोंडाला पानं पुसण्याचा प्रकार चालू आहे, अशी टीकाही पवारांनी केली.

सर्वोच्च न्यायालय म्हटलं की हे नपुंसक सरकार आहे. अरे या सरकारला काही जनाची नाही तर मनाचीही वाटत नाही का? या पद्धतीने हे सरकार चालवतायत का? असा सवालही त्यांनी शिंदे, फडणवीस सरकारला विचारला.

काँग्रेसे नेत्यांची टीका

यावेळी निर्णय बेभान, प्रसिद्धी वेगवान असं हे सरकार असल्याचे चव्हाण म्हणाले.तर बाळासाहेब थोरात यांनी विरोधात बोलणाऱ्याला ईडी लावली जाते, विरोधात बोलायचं नाही अशी परिस्थिती राज्यात आणि केंद्रात असल्याबद्दल तीव्र टीका केली. अदानींच्या खात्यात २० हजार कोटी रुपये कुठून आले याचं उत्तर सरकाराने दिलं नाही असे बाळासाहेब थोरात यांनी विचारले.

सावरकरांचा अपमान नको'

तर ज्या राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीरांचा अपमान केला त्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचे पाप जे कोणी करत आहेत, त्यांना महाराष्ट्रातील जनता सडेतोड उत्तर देईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

सावरकरांचा त्याग, बलिदान विसरून अपमान होत आहे. ते प्रखर हिंदुत्ववादी होते, देशभक्त होते. एक दिवस तुम्ही सेल्युलरमध्ये राहू शकता का? अशी विचारणा त्यांनी केली. सावरकरांचा सातत्याने अपमान केला जात आहे. जाणून बुजून त्यांच्याविरोधात बोललं जात आहे. या लोकांना सडेतोड उत्तर देण्यासाठी ही यात्रा काढली आहे. सावरकरांबद्दल एकही शब्द कोणी ऐकणार नाही, सहन करणार नाही, म्हणून ही गौरव यात्रा काढण्यात आली आहे. तसेच सावरकरांचे विचार घराघरात पोहोचवण्यासाठी ही यात्रा भाजपा आणि शिवसेनेने काढली आहे. त्यांच्यावर प्रेम करणारे, त्यांचे अनुकरण करणाऱ्यांचं मी या यात्रेत स्वागत करतो.असे शिंदे यांनी सांगितले.

प्रकल्पग्रस्त एकवटले

केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात वाढीव रक्कम दिली जाईल. असा सामंजस्य करार करण्यात आला होता. याबाबत अलिबागचे उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांना निवेदन दिले आहे. यावेळी ॲड. विनायक शेडगे, मंगेश गायकर, अजय चवरकर, रमाकांत पाटील, मोहन ठाकूर,संतोष सुतार, जितू गायकर, दिलीप रोटकर आदी प्रकल्पग्रस्त व शेतकरी उपस्थित होते.

लाच घेणाऱ्या पोलिसास अटक

१ लाख रूपये फिर्यादीचा भाऊ यांचे कडून स्वीकारून फिर्यादी यांची फसवणूक केले तसेच उमेदवार हा रोहा तालुक्यातील आहे. या पोलीस कर्मचाऱ्याची व उमेदवाराची काही महिन्यांपूर्वी ओळख झाली. रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेसाठी मदत करण्यासाठी त्याच्याकडून एक लाख रुपयांची मागणी केली होती. हा व्यवहार गेल्या दोन महिन्यांपासून सुरु होता. ही बाब रायगड पोलीसांच्या लक्षात आल्यावर पडताळणी करून ३१ मार्च रोजी पोलीस हवालदार मोकल याच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

शिवकरमधील हत्या

त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे या गुन्ह्यातील तिन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

निवडक

रिमोट रेडिओची चोरी

रसायनी : टेकडीवरील टॉवरवर बसवण्यात आलेल्या रिमोट रेडिओवर चोरट्याची वक्रदृष्टी पडली आहे. चोरट्यांनी २५ हजार रुपये किंमतीचा रिमोट रेडिओ चोरून नेला आहे. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत घोसाळवाडी गावानजीक टेकडीवरील मोकळ्या जागेतील टॉवरवर लावलेला रिमोट रेडिओ युनिट अज्ञात व्यक्तींनी चोरून नेला आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी पोलीस अधिकारी अधिक तपास करत आहेत.

पाम संडे साजरा

रसायनी : बिलीवर्स ईस्टर्न चर्च कोळखे येथे पाम संडे किंवा झावळ्याचा रविवार हा सण दि.२ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ताडाच्या झाडाच्या पानांनी चर्चची केलेली सजावट हि मंत्रमुग्ध करणारी होती. ह्या पवित्र सणाचा विधी हिज ग्रेस मार्टिन मोर एप्रेम इपिस्कोपा आणि रेवरेंट फादर संकेत मसिह यांनी पार पाडला तसेच चर्चच्या परिसरामध्ये गीत-भजन गात पदयात्रा पण करण्यात आली होती. हा सण ख्रिस्ती बांधव लोक मोठ्या उत्साहात साजरे करतात.

उरणमध्ये काँग्रेस आक्रमक

उरण : काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना सरकारी घरातून काढून टाकून भाजपा सरकारने राहूल गांधीवर अन्न्याय केला आहे. त्यामुळे राहूल गांधीची भूमिका जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी काँग्रेसच्या वतीने उरण तालुक्यात अभियान राबविणार असल्याचे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विनोद म्हात्रे यांनी सांगितले. यावेळी रायगड जिल्हा उपाध्यक्ष किरीट पाटील, प्रकाश पाटील, मार्तण्ड नाखवा, अफशा मुकरी, सदानंद पाटील, निर्मला पाटील आदी सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

चिरनेरमध्ये आरोग्य शिबीर

चिरनेर : चिरनेर जनरल हॉस्पिटल व जे एम म्हात्रे चारिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार (२) एप्रिल रोजी चिरनेर मुळपाडा येथील जनरल हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर आरोग्य शिबिराचे उद्घाटन डॉ. संतोष पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संजय पाटील, सचिन घबाडी, शितल घबाडी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.डॉ. पुजा सिंग, डॉ. सुधीर केणी, किशोर म्हात्रे सोनाली पाटील यांनी या शिबिराचे व्यवस्थापन केले.

उरणमध्ये स्वच्छोत्सव

उरण : उरण स्वच्छोत्सव जागृती रॅलीचे आयोजन शुक्रवार (ता. ३१) काढण्यात होती. ही रॅली उरण नगरपालिका येथून सुरू करण्यात आली. स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ अंतर्गत अनिल जगदाने यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामुदायिक प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमासाठी सायली म्हात्रे, अनिल जगदाने, सुरेश तांडेल, सचिन भानुसे, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस भरती लेख परीक्षा शांततेत

परीक्षार्थ्यांना निकालाचे वेध

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाच्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी (२ एप्रिल) रोजी आठ केंद्रात घेण्यात आली. तीन हजार ५३५ उमेदवारांपैकी एक हजार ७९३ जणांनी परीक्षा दिली. यामध्ये ५३५ महिलांचा समावेश होता. सकाळी साडेआठ ते दहा या वेळेत झालेली लेखी परीक्षा शांततेत पार पडली. आता उमेदवारांना निकालाची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

रविवारी सकाळी साडेआठ वाजता प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी सकाळी साडेसहा वाजता, प्रवेशपत्र देण्याची प्रक्रिया सुरु होणार होती. परीक्षेच्या कालावधीत उशीर होऊ नये यासाठी काही विद्यार्थी गेल्या दोन दिवसांपासून अलिबागमध्ये राहिले. तर काही विद्यार्थी रात्रीच अलिबागमध्ये दाखल झाले. काही हॉटेलमध्ये तर काही त्यांच्या नातेवाईकांकडे राहिले. लेखी परीक्षा पारदर्शक व्हावी यासाठी आदल्या दिवसापासून परीक्षा केंद्रांवर पोलिसांचा कडेकोट पहारा तैनात करण्यात आला होता. जिल्ह्यातील ५० टक्के पेक्षा अधिक पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा यावेळी बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

अलिबागमधील जेएसएम महाविद्यालय, ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ, जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, को. ए.सो. जा.र. ह कन्याशाळा, कुरुळ येथील आरसीएफ सेकंडरी ॲन्ड हायर सेकंडरी स्कूल, वेश्वी येथील पीएनपी कॉलेज, होली चाईल्ड स्कूल व पीएनपी मराठी हायस्कूल या आठ केंद्रात परीक्षा घेण्यात आल्या. ही परीक्षा शांततेत पार पडली असून कोणताही गैरप्रकार परीक्षेच्या कालावधीत झाला नसल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली.

(संग्रहीत छायाचित्र)

> पोलीस शिपाई पदाच्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी पार पडली. ही परीक्षा शांततेत झाली आहे. या परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार असून त्याची प्रक्रिया वेगाने सुरु राहणार आहे. त्यामुळे येत्या ४ एप्रिल पर्यंत या परीक्षेचा निकाल जाहीर होणार आहे.
> - सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक

१,७९३ जण प्रत्यक्ष परीक्षेला

रायगड जिल्हा पोलीस भरती २०२१ च्या लेखी परीक्षेसाठी ३ हजार ५३५ उमेदवारांपैकी १ हजार ७९३ जणांनी परीक्षा दिली. यामध्ये ५३५ महिलांचा समावेश आहे. २७२ जागांसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली. रायगड जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया २०२१ साठी एकूण २७२ जागांसाठी १९ हजार १७६ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर केले होते. त्यापैकी लेखी परीक्षेकरिता ३,५३५ उमेदवार पात्र झाले असून त्यामध्ये ९२९ महिला उमेदवारांचा समावेश होता. लेखी परीक्षेकरिता ३,५३५ उमेदवारांपैकी १ २५८ पुरुष उमेदवार तर ५३५ महिला उमेदवार हजर होते. उमेदवारांच्या लेखी परीक्षेत कोणातही अनुचित प्रकार घडू नये याकरीता रायगड जिल्हा पोलीस दलातर्फे बंदोबस्त ही ठेवण्यात आला होता. परीक्षेकरिता आवश्यक साधनसामुग्री परीक्षा केंद्रावर पुरविण्यात येवून अत्यंत पारदर्शकपणे परीक्षा घेण्यात आली. लेखी परीक्षा पूर्णपणे पारदर्शक असून या परीक्षेवेळी रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे स्वतः परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून लेखी परीक्षा प्रक्रियेमध्ये कोणताही अनुचित प्रकार याकरीता विशेष खबरदारी घेतली होती. या परीक्षेचा निकाल शासनाच्या WWW. raigadpolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

विठ्ठलवाडीत प्राणी अनाथालय सुरू

गणेश नायक प्राण्यांसाठी ठरतोय खरा नायक

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

अनाथ व वृद्ध नागरिकांसाठी ठिकठिकाणी वृद्धाश्रम व अनाथालय असतात, याचा त्यांना मोठा आधारही असतो, मात्र जखमी व वृद्ध पशु पक्षी प्राण्यांच्या जीवनाच हे मोल राखत मानवतेच्या दृष्टीकोनातून एका तरुणाने प्राणी अनाथालय सुरू केले आहे. जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कोलाड विठ्ठलवाडी इथं सात एकर जागेत animal matter to me या संस्थेच्या माध्यमातून गणेश नायक हा अनाथ व जखमी पाळीव प्राण्यांसाठी खरा नायक ठरत आहे. रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेले गुरे, श्वान, मांजर व अन्य प्राणी यांच्यासमोर मृत्यू उभा असतो, त्याखेरीज त्यांच्याकडे अन्य पर्याय ही नसतो. मात्र त्यांच्या जीवनात जगण्याची उमेद हे अनाथालय जागवते. या माध्यमातून अनाथ व जखमी प्राण्यांना हक्काचे आश्रयस्थान मिळत आहे.

अशा पशु प्राण्यांना अनाथलयात नेऊन त्यांच्यावर उपचार केले जातात. बरे झाल्यावर त्यांना त्यांच्या अधिवासात सोडले जाते, तर वृद्ध प्राण्यांचे पालन पोषण याच ठिकाणी केले जातेय. प्राणी मात्रावरील भूतदया प्रेरणादायी ठरतेय. गुरे, कोंबड्या, बकऱ्या, कुत्रे, मांजर, डुकर आदींसाठी हे अनाथालय महत्वपूर्ण वरदान ठरत आहे.

> भटके प्राणी जनावरे यांचे रस्त्यावर अपघात होतात. जखमी प्राण्यांना ते घेऊन अनाथालयात नेतो, त्यांच्यावर उपचार करून त्यांच्या अधिवासात सोडतो व वृद्ध जनावरे प्राणी यांचे संगोपन करतो. आईने हे काम सुरू केले होते, तिचे स्वप्न होते ते काम पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न आहे. १२ वर्षात १८ हजार जनावरे वाचवले आहेत. आईच्या स्वप्नांना साकारण्याचे काम करीत आहे.
> - गणेश नायक

गोमांस करणारा कंटेनर पकडला

। रसायनी । वार्ताहर ।

गोमांसाची वाहतूक करणारा कंटेनर रसायनी पोलिसांनी भाताण भोगद्याच्या जवळ पकडला. गेल्या आठवड्याभरात गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना पकडण्याची ही तिसरी वेळ आहे. सदर बाबतीत विशेष वृत्त असे की, मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर भाताण बोगद्याजवळ एक कंटेनर रसायनी पोलिसांना संशयास्पद आढळल्याने त्याची पाहणी केली असता त्या कंटेनरमध्ये १० लाख आठ हजार रूपये किंमतीचे गोमांस आढळले. सदर प्रकरणी कंटेनर (क्र. एचआर ३८ एस ७२८०) चालक पेशकुमार ध्रुवनारायण सिंग (रा. बिहार) यास रसायनी पोलिसांनी कोणतीही कागदपत्र जवळ न बाळगता अवैधरित्या गोमांसाची वाहतूक केल्याप्रकरणी अटक केली आहे.

सदर कंटेनर हा तेलंगणा येथील असून कंटेनरचा मालक अंकुश याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी कंटेनर आणि गोमांस असा एकुण ४५ लाख आठ हजार रूपयांचा मुद्देमाल रसायनी पोलिसांनी जप्त केला आहे.

उरण-खारकोपर लोकलची चाचणी

अनेक स्थानकांची कामे अपूर्ण अवस्थेत

। उरण । वार्ताहर ।

नवी मुंबईला जोडणाऱ्या उरण ते खारकोपर लोकलचा मार्ग १५ एप्रिलला सुरू होण्याची शक्यता आहे. त्यासाठी सोमवार (३ एप्रिल) ला या मार्गावर पुन्हा एकदा चाचणी होणार आहे. यावेळी उरण ते खारकोपर मार्गावरील सुविधा, अडचणी यांचा आढावा घेण्यात येणार असल्याची माहीती रेल्वेच्या सुत्रांकडून मिळाली आहे. यापूर्वी ३१ मार्चला हा मार्ग सुरू होणार असल्याचे वृत्त पसरले होते. मात्र हा मार्ग सुरू न झाल्याने उरणमधील नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यातच या मार्गावरील अनेक स्थानकांची कामे अपूर्ण आहेत. मार्ग सुरू होण्याची चिन्हे निर्माण झाल्याने सध्या या कामांना वेग आला आहे.

उरण स्टेशन परिसरात सध्या रेल्वेचा भोंगा वाजू लागल्याने उरण ते खारकोपर हा लोकल रेल्वे मार्ग सुरू होण्याची प्रचंड उत्सुकता आणि उत्कंठा उरणकारांना लागली आहे. ही सेवा लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी इच्छा उरणमधील प्रवासी व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र उरण ते खारकोपर मार्गावरील रेल्वे रूळ आणि त्याची तपासणी रेल्वेच्या सुरक्षा विभागाने चाचण्या केल्या आहेत. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी तयार असल्याचा अहवाल ही रेल्वेला विभागाला सादर केला आहे. परंतु आज पर्यंत या मार्गावरील उरण, द्रोणागिरी,न्हावा-शेवा,रांजणपाडा व गव्हाण या रेल्वे स्थानकांची कामे अपूर्ण आहेत. यामध्ये उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व रांजणपाडा येथील पार्किंगची तसेच येथील प्रवाशांसाठी प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठीच्या मार्गाची कामे अपूर्ण आहेत.

आम आदमी पार्टीचे जन आक्रोश आंदोलन

पाली/बेणसे । वार्ताहर ।

महावितरणकडून लॉकडाऊन काळात १ एप्रिल २०२० पासून २० टक्के वीज दर वाढ करण्यात आली होती. संपूर्ण देशात महागडी वीज महाराष्ट्र राज्यात आहे. तरीही आता वीज कंपन्यांकडून वीज दर वाढीचा प्रस्ताव ठेवला आहे व तसेच मागील काही महिन्यांपासून घरगुती गॅसच्या दरात सुध्दा वाढ करण्यात आली आहे. या विरोधात गुरुवार (१३) रोजी सकाळी १०:०० वा. बल्लालेश्वर मंदिर पाली ते महावितरण कार्यालय पाली पर्यंत आम आदमी पार्टी सुधागड तर्फे जन आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून आम आदमी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सोमवार (०३) एप्रिलपासून गावोगावी जाऊन वीज बील वाढ प्रश्नावर जनतेशी संवाद साधणार आहेत व जन आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करणार आहेत.

महागाईचा आगडोंब उसळला आहे. जनता महागाईने होरपळून निघाली आहे. अशातच वीजबिल व घरगुती गॅस वाढ होणार असल्याने सर्वसामान्य गोरगरीब जनता जगावे की मरावे या द्विधा मनस्थितीत आहे. महागाईने महिला प्रचंड त्रस्त आहेत. घराचे आर्थिक गणित बिघडले आहे. ही लुट थांबविण्यासाठी आम आदमी पार्टी सुधागड यांच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन पुकारण्यात येत आहे. व जनतेस आवाहन करण्यात येत आहे की, जास्तीत जास्त संख्येने सामील व्हावे असे आवाहन आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष हरिचंद्र शिंदे व अशोक रायकर यांनी केले आहे.

मुलीचे अपहरण करणारा गजाआड

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील चेरीवली येथून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या तरुणास पनवेल तालुका पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीदाराच्या सहाय्याने वाजे येथून गजाआड केले आहे तसेच त्याच्याकडून अपहरित मुलीची सुखरूप सुटका केली आहे.

तालुक्यातील चेरवली येथून एक १६ वर्षीच्या अल्पवयीन मुलगी हायस्कुला जाते असे सांगुन घराबाहेर पडली मात्र पुन्हा घरी न परतल्याने तिच्या घरच्यांनी तिला कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण करून पळवून नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल केली होती. घटनेचे गांभार्य ओळखून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अम्बिका अंधारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, सुनील कुदळे, महेश धुमाळ, प्रकाश मेहर आदींच्या पथकाने यासंदर्भात अधिक तपास करत असताना त्यांना अपहरीत मुलगी एका इसमासोबत सतत संर्पकात असल्याचे निर्दशनास आले. याप्रकरणी पोलिसांचे एक पथक चौक येथे जाऊन संशयीत मुलाचे मोबाईलचे तांत्रिक तपास करीत असताना त्यातील मोस्ट कॉलर यास ताब्यात घेवुन गुन्हयाची चौकशी केली असता त्याने एका २३ वर्षीय तरुणाने एका मुलीचे अपहरण करून तिला चौक येथे लपवून ठेवले असल्याचे माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेवून त्याच्याकडून अपहरीत मुलीची महीला पोलीस अमलदारांकरवी सुरक्षितरित्या सुटका केली.

गुरूवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

। अलिबाग । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यात समाजोपयोगी कार्यात अग्रेसर असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील श्रीपंत भक्त मंडळ संचलित गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठान पेझारी यांच्या वतीने देण्यात येणारे प्रतिष्ठेचे गुरूवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानचे सन्मान पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले.

रविवार ९ एप्रिल २०२३ रोजी सकाळी १० वाजता अलिबाग तालुक्यातील श्रीदत्त मंदिर सभागृह पेझारी येथे गुरुवर्य सुभानराव राणे यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित गुरूवर्य सुभानराव राणे सन्मान सोहळ्यात परमपूज्य रंजन पंतबाळेकुंद्री यांच्या अध्यक्षतेखाली हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. शनिवार १ एप्रिल रोजी विविध क्षेत्रातील सन्मान पुरस्कार्थींच्या नावांची घोषणा श्रीपंत सांप्रदाय रायगड जिल्हाप्रमुख व प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर राणे यांनी केली आहे.

या सन्मान सोहळ्यात रविंद्र थळे, राजेंद्र राऊत (शैक्षणिक क्षेत्र), जय पाटील, गौरव डिंगणकर, संयुक्ता हुजरे (राजपथावरील प्रजासत्ताक परेडमधील सहभागी विद्यार्थी), साईराज म्हात्रे, जान्हवी पाटील (विज्ञान प्रदर्शन), सचिन म्हात्रे, निशिकांत पाटील (उद्योग क्षेत्र), दिपक पाटील, सुधीर नाझरे, प्रफुल्ल पवार (पत्रकारिता क्षेत्र), सुनिता पाटील (आरोग्य क्षेत्र), मुकेश नाईक, गार्गी ठाकूर (नाट्यक्षेत्र), तुषार पाटील (क्रीडाक्षेत्र), डॉ. ओंकार किंजवडेकर व सायकल क्लब अलिबाग (पर्यावरण क्षेत्र), राजन पंतबाळेकुंद्री, डॉ. संजय पंतबाळेकुंद्री, सुहास सातोस्कर, संजय राव, दिनेश सुर्वे, रविंद्र नाईक, रघुनाथ पाटील, रमेश कुलकर्णी या सर्वांना अध्यात्मिक क्षेत्रातील पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून, गुरूवर्य सुभानराव राणे यांच्या नावाने दिला जाणारा गुरूवर्य सुभानराव राणे सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार यंदा श्रीपंतवाडी गोहे, ता. खालापूर यांना प्रदान करण्यात येणार आहे

या सन्मान सोहळ्यासाठी खा. अरविंद सावंत, माजी आ. पंडितशेठ पाटील, माजी जि.प अध्यक्ष आस्वाद पाटील, भावना पाटील, चित्रा पाटील, चित्रलेखा पाटील, सुमना पाटील, सवाई पाटील, महादेव शहाबाजकर, पंडित अरूण कारेकर, राजन पंतबाळेकुंद्री, डॉ.संजय पंतबाळेकुंद्री, अभिजित पंतबाळेकुंद्री, सखाराम पवार हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क, तरुणांचाच सहभाग घेण्याचा प्रशासनाचा निर्णय

पूरग्रस्तांच्या मदतीला धावणार आपद मित्र

। अलिबाग । प्रतिनिधी ।
महाड येथील दरड, पूर परिस्थितीनंतर रायगड जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. प्रशासकिय यंत्रणेसह गावांतील तरुणांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी गाव पातळीवर आपद मित्रांची निवड करण्यात आली आहे. आपत्ती निवारणासाठी गावांतील १८ ते ४० वयोगटातील ३०० जणांचा सहभाग असून हे आपद मित्र पुरग्रस्तांच्या मदतीला एक वरदान ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जिल्ह्यात सतत होत असलेल्या खोदकामांमुळे जमिनीची धुप दिवसेंदिवस होत आहे. दरड कोसळ्याच्या घटना सतत वाढत आहेत. ग्रामीण भागासह शहरी भागात पुर परिस्थितीचा धोका वाढू लागला आहे. दरवर्षी पावसात दरड कोसळ्याबरोबरच पुराची समस्या कायमच भेडसावू लागली आहे. दरड व पुर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनासह तालुका, गाव पातळीवरील प्रशासन शर्तीचे प्रयत्न करते. परंतू त्यावर ठोस उपाययोजना करण्यास प्रशासन उदासीन ठरते.

आपत्कालीन परिस्थिती आटोक्यात आणताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागते. आपतीच्या काळात गावांतील तरुणांचाच सहभाग घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. गावातील भौगोलिक परिस्थितीची माहिती स्थानिकांना अधिक असल्याने त्यांच्या मदतीने आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील १८ ते ४० वयोगटातील ३०० जणांना प्रशिक्षण दिले. प्रात्यक्षिकांसह वेगवेगळ्या माध्यमातून मार्गदर्शन करून त्यांना आपत्कालीन परिस्थितीत सामना करण्यासाठी बळ देण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील माजी सैनिक, एनसीसी कॅडेट, एनएसएसचे विद्यार्थी, नेहरू युवा केंद्राचे युवक युवती, होमगार्ड, पोलीस मित्र, जीवरक्षक, सागरी सुरक्षा दलातील स्वयंसेवक, नागरीक संरक्षण दलाचे स्वंयसेवक व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रामध्ये कार्य करण्यांना प्राधान्य देण्यात आले. आपत्तीबाबत पुर्व सुचना करणे. आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे अशी अनेक कामे या मित्रांच्या माध्यमातून केली जाणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत गरजूंना मदत करण्यापासून आपदग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

चौदावे पुण्यस्मरण

स्व. सौ. उषा जयवंत पाटील
जन्म दि. १३-६-१९६९ मृत्यू दि. ०३-०४-२००९

शब्दांतून दुःख व्यक्त करता आले असते
तर अश्रूंची गरज भासली नसती
सर्व काही शब्दांत सांगता आले असते तर
भावनांची किंमतच उरली नसती

शोकाकुल
पती-जयवंत, बहिण- सौ. दिप्ती (दिपा), मुलगी- प्रिती, मुलगे- आविष्कार व अथर्व, सासू- श्रीमती लिलाबाई, जाऊ- सौ. अंजना , मैत्रीण- सौ. मालती, सर्व पाटील परिवार आणि मित्र परिवार
मु. रांजणखार, ता. अलिबाग, जि. रायगड

राम आणि मोदींची पदवी

शिक्षणाचा आणि कर्तृत्वाचा संबंध नसतो. सरकार चालवण्यात तर नक्कीच नाही. श्रीकांत जिचकारांकडे अनेक पदव्या होत्या. ते एमडी डॉक्टर होते. एलएलएम व एमबीए होते. २८ पदवी परिक्षांमध्ये त्यांनी सुवर्णपदक मिळवले होते. शिवाय आयएएसही पास होते. पण राजकारणात फार मजल मारू शकले नाहीत. याउलट, वसंतदादा पाटील. ते केवळ चौथी पास होते. पण सरकार कसे चालते हे त्यांना ठाऊक होते. साखर कारखाने, बँका यांची त्यांना इत्यंभूत माहिती होती. चांगले मुख्यमंत्री म्हणून लोक आजही त्यांचे नाव घेतात. आता राजकारण्यांच्या शिक्षणाचा स्तर वाढला आहे. बहुतेकांकडे किमान पदवी असतेच. शिवाय, पदवी मिळवणे हा भारतात काही फारसा कठीण प्रकार नाही. येता-जाता आणि अगदी स्वस्तात कोणालाही किमान बीएची पदवी नक्की मिळवता येते. आपले सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अलिकडपर्यंत पदवीधर नव्हते. मुख्यमंत्री उद्धव यांनी राष्ट्रवादीशी युती केल्यामुळे त्यांना संधी मिळाली. सगळा निधी आणि सगळी कामे अजितदादा आपल्याकडे घेऊ लागले. मंत्री शिंदे यांना मोकळा वेळच वेळ मिळाला. २०२० मध्ये त्यांनी मुक्त विद्यापीठाची परिक्षा दिली. त्यांना ७७ टक्के गुण मिळाले. आता तर ते मानद डॉक्टर आहेत. सरकार कसे पाडावे या विषयाचे पीएचडी गाईड म्हणूनही ते काम करू शकतील. असो. त्यामुळे, राजकारणात सध्या सर्वांचे बाप ठरलेले नरेंद्र मोदी हे साधी पदवी मिळू शकणार नाहीत असे कोणीच म्हणणार नाही. अरविंद केजरीवाल यांनाही तशी शंका नसावी. राज्यशास्त्र या विषयात गेली सहा वर्षे दिल्लीत मोदी त्यांना रोज एक नवीन धडा देत आहेतच. म्हणूनच बहुदा चिडून जाऊन त्यांनी मोदींच्या पदवीचा कागद पाहायला मागितला आहे. त्यांना शंका आहे की तो अस्तित्वात नाही.

देशद्रोह कायदाच लावा

भारतात कागदाला महत्व आहेच. उदाहरणार्थ, तुमच्या पन्नास पिढ्या या देशात राहिल्या असतील. पण तरीही सरकार तुमच्या नागरिकत्वाचा पुरावा मागू शकते. तसा कायदाच आला आहे. यासाठी आसाममध्ये अनेक लोक बंदिवासात गेले. यातले काही जण माजी राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांचे नातेवाईक होते. दुसरे काही जण एकेकाळी भारतीय सैन्यात होते. लढाया लढले होते. आता पेन्शनही घेत होते. पण त्यांच्याकडे कागद नव्हता. त्यांचे बापजादे मेल्यालासुध्दा अनेक वर्षे झाली होती. त्या मेलेल्यांचे जन्म प्रमाणपत्र सरकारला हवे होते. ते नसेल तर हे जिवंत असलेले बेकायदा नागरिक ठरत होते. सारांश कागदाला किती महत्व आहे हे मोदी सरकारनेच सर्वांना बजावले होते. मात्र तीच गोष्ट केजरीवाल यांनी खुद्द मोदींना लागू करणे हे गैर आहे. काही झाले तरी, मोदी हे विश्वगुरू आणि जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते आहेत हे विसरता कामा नये. आपण गुजरात आणि दिल्लीमधून बीए आणि एम ए राज्यशास्त्र अशा पदव्या घेतल्या आहेत असे मोदी म्हणतात. निवडणुकीसाठी उमेदवारी भरताना तसे त्यांनी लिहून दिले आहे. केजरीवाल त्याचा पुरावा मागत होते. गुजरातच्या उच्च न्यायालयाला ते आवडले नाही. त्यांनी केजरीवालांना २५ हजारांचा दंड ठोठावला. खरे तर मोदींवर अविश्वास दर्शवणे हा देशद्रोहाचा गुन्हा ठरवायला हवा. अजूनही सरकारला तसा अध्यादेश काढून तो पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करता येईल. अन्यथा, केजरीवाल हा मुद्दा वरच्या न्यायालयात नेऊन देशामध्ये गोंधळ माजवण्याचा धोका आहे. निवडणूक प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती देणे हा गंभीर गुन्हा आहे. त्याला राहुल गांधींइतकी किंवा जास्तदेखील शिक्षा होऊ शकते, असे म्हणतात. पण मोदींना राहुल यांच्या रांगेत बसवण्याचा प्रयत्न करणे हा नवाच दहशतवाद झाला. त्यामुळे केजरीवालांवर दहशतवादविरोधी कायदाही लागू करायला हवा.

श्रध्देचा सवाल!

गटारातून निर्माण होणाऱ्या गॅसवर चहा तयार करता येईल असे नरेंद्र मोदी एकदा म्हणाले होते. गणपती हे पहिल्या प्लास्टिक सर्जरीचे उदाहरण आहे असेही ते म्हणाले होते. जागतिक तापमानवाढ असा काही प्रकार नाहीच असाही दावा एकदा त्यांनी केला होता. आपल्याकडच्या अतिशिकलेल्या लोकांना हे दावे मूर्खपणाचे वाटतात. केजरीवालही त्यांच्यातलेच एक. या स्वतःला शहाणे समजणाऱ्यांचा अशा चमत्कारांवर विश्वास नसतो. खरे तर मोदींनी आता एक वैज्ञानिक मंडळ स्थापन करायला हवे. मोदींनी काहीही दावा केला तरी त्यामागे वैज्ञानिक सत्य कसे दडले आहे हे शोधून काढणे हे या मंडळाचे काम असायला हवे. गोमूत्रामध्ये आणि गायीच्या शेणामध्ये कसे गुणधर्म आहेत हे शोधून काढण्यासाठी रघुनाथ माशेलकर प्रयत्न करीत आहेत असे मध्यंतरी प्रसिध्द झाले होते. खरे तर माशेलकर यांना तो शोध लावण्यासाठी इतके दिवस का लागावेत हेच एक कोडे आहे. कारण या गुणधर्मांचं आपल्या शास्त्रपुराणांमध्ये आधीच वर्णन केलेले आहे. त्यांनी तेच उतरवून काढले तरी पुरले असते. असो. दुसरे असे की, प्रत्येक चमत्कारामागचे विज्ञान दरवेळी लगेच कळेल असे नसते. उदाहरणार्थ अदानी हा अवघ्या चार वर्षात अंबानीला देखील मागे टाकून जगातला दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत झाला हा चमत्कार या देशातील लोकांनी पाहिला आहे. तो कसा झाला हे अजून कोणालाही कळलेले नाही. राहुल गांधींसारखे अश्रद्ध लोक देशाबाहेरून अदानीच्या कंपनीत आलेल्या वीस हजार कोटी रुपयांचा हिशेब मागत आहेत. हे म्हणजे केजरीवालांनी मोदींच्या पदवीचा कागद मागण्यापेक्षाही वाईट आहे. अदानीच्या चमत्कारामागचे रहस्य कळले नाही म्हणून त्यामागे विज्ञान नाही असे कोण म्हणेल? ते असणारच. अयोध्येत बाबरी मशीद होती तिथेच रामाचा जन्म झाला होता ही या देशातील कोट्यवधी लोकांची श्रध्दा होती. न्यायालयाच्या निकालातूनही शेवटी तिला मान्यता देण्यात आली. त्याचनुसार, मोदींकडे कागद असो वा नसो त्यांच्या पदवीवर या देशातील सर्व भक्तांची श्रद्धा आहे. गुजरात न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. विषय संपला.

विचार

बिहारमध्ये जोरदार राजकीय करामती

संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीशकुमार यांच्या राष्ट्रीय राजकारणात सक्रीय होण्याची आणि तेजस्वी यादव यांची मुख्यमंत्री होण्याची चर्चा सुरू असताना 'ईडी' आणि 'सीबीआय'ने रेल्वेतील 'नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळ्या'प्रकरणी चौकशी सुरु केल्याने राष्ट्रीय जनता दलाची कोंडी झाली आहे. त्यात राजनीतीकार प्रशांत किशोर यांनी काढलेल्या यात्रेमुळे ढवळून निघालेले वातावरण बिहारमध्ये महत्वपुर्ण राजकीय तरंग उमटवत आहे.

शिवशरण यादव

बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांची नवी दिल्लीतील सीबीआय मुख्यालयात नऊ तास चौकशी करण्यात आली. पुन्हा दुसऱ्या फेरीची चौकशी सुरू झाली. बंद खोलीत निवडक सीबीआय अधिकाऱ्यांच्या पथकाने त्यांना अनेक प्रश्न विचारले आणि त्यांची उत्तरे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे रीतसर नोंदवली गेली, जी या प्रकरणात कागदोपत्री पुरावा म्हणून वापरली जातील. या प्रकरणात थेट सहभागी असलेल्या निवडक सीबीआय अधिकाऱ्यांनाच चौकशीसाठी परवानगी देण्यात आली होती. चौकशीशी संबंधित कोणतीही माहिती अधिकृतपणे समोर आलेली नाही. मात्र, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस्वी यांच्याकडून या घोटाळ्याशी संबंधित सर्व गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्याकडून 'मेसर्स एबी एक्सपोर्ट लि.' आणि 'मेसर्स एके इन्फोसिस्टीम प्रा. लि.' यासारख्या कंपन्यांमधील मालकी हक्कांबद्दल माहिती मागवण्यात आली होती. या कंपन्यांमध्ये कोट्यवधींचे व्यवहार झाले आहेत. एबी एक्सपोर्ट या कंपनीची उलाढाल कागदोपत्री फक्त चार लाख रुपये आहे; पण दिल्लीच्या पॉश न्यू फ्रेंड कॉलनी भागात १५० कोटी रुपयांच्या बंगल्यात त्याचे कार्यालय आहे. रेल्वे घोटाळ्याचे पैसे या कंपनीच्या नावावर ट्रान्सफर झाले होते, असा तपासी यंत्रणांचा आक्षेप आहे.

या प्रकरणी 'सीबीआय'ने दिल्ली उच्च न्यायालयाला तेजस्वी यादव यांना अटक करणार नसल्याचे आश्वासन दिले होते. २००४ ते २००९ या काळात तत्कालीन रेल्वेमंत्री लालू प्रसाद यांच्या कार्यकाळात मोठ्या संख्येने लोकांना बेकायदेशीरपणे रेल्वेत सामावून घेण्यात आले. 'सीबीआय'ने या प्रकरणी स्वतंत्र फिर्याद नोंदवून तपास सुरू केला आहे. या फिर्यादीनुसार, नोकरीच्या बदल्यात उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात जमिनी 'राइट ऑफ' करण्यात आल्या. या जमिनी लालूप्रसाद यांच्या कुटुंबीयांच्या नावावर करण्यात आल्या. या प्रकरणी यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री राबडी देवी यांचीही पाटणा येथील शासकीय निवासस्थानी चौकशी करण्यात आली होती. चौकशी संपल्यानंतर तेजस्वी यादव यांनी माध्यमांशी संवाद साधला. कोणताही घोटाळा झाला नसल्याचे त्यांनी पुन्हा सांगितले. अलिकडे झालेल्या मॅरेथॉन चौकशीमध्ये तेजस्वी यादव यांना नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळ्याशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले.

बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार मोदी यांनी या प्रकरणावर राष्ट्रीय जनता दल आणि संयुक्त जनता दल या दोन्ही पक्षांना घेरले आहे. ज्या लोकांनी या घोटाळ्याशी संबंधित पुरावे 'सीबीआय'ला दिले तेच आता या संपूर्ण प्रकरणावर राजकारण करत असल्याचे सुशीलकुमार मोदी म्हणाले. संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दलात मतभेदाची दरी निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लालूप्रसाद यांचे कुटुंबीय 'सीबीआय'ला सत्य सांगायला का घाबरतात, असा सवाल ते करतात. आपण दिल्लीच्या फ्रेंड्स कॉलनीतील १५० कोटी रुपयांच्या घराचा मालक कसे बनलो हे तेजस्वी यांनी सांगावे, असे सुशीलुकमार मोदी म्हणाले. संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष लल्लन सिंग यांनीच 'सीबीआय'ला ठोस पुरावे दिले होते, असा आरोप त्यांनी केला. संयुक्त जनता दलाचे शरद यादव आणि लल्लन सिंग यांनी डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना निवेदन सादर करून या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली होती. पुढे नितीशकुमार यांच्या सांगण्यावरून लल्लन सिंग यांनी सीबीआयला भक्कम पुरावे दिले. आता संयुक्त जनता दल या मुद्द्यावर राजकारण करत आहे. राष्ट्रीय जनता दल आणि संयुक्त जनता दलाने भ्रष्टाचारासारख्या गंभीर विषयाला राजकीय मुद्दा बनवले आहे; मात्र या घोटाळ्याचे सत्य बाहेर येईल, असे ते म्हणतात.

लल्लन सिंह यांनी हा भाजपच्या अस्वस्थतेचा आणि रोषाचा परिणाम असल्याचे म्हटले होते. गेल्या अनेक वर्षांपासून घोटाळ्याची फाईल बंद होती; मात्र नितीशकुमार महाआघाडीत सामील होताच 'सीबीआय'ला दिव्य ज्ञान मिळाले. राष्ट्रीय जनता दलाचे नेते शिवानंद तिवारी म्हणाले की, तेजस्वी यादव यांनी स्वतः सीबीआयला आव्हान दिले होते. त्यांची चौकशी करून काहीही सापडणार नाही. रेल्वेमध्ये नोकरीच्या बदल्यात एक चतुर्थांश जमीन द्यायचे एका व्यक्तीच्या भावाकडून लिहून घेतल्या किंवा भेट दिल्याप्रकरणी लालू-राबडी यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याची चौकशी होणार आहे. सीबीआयने गेल्या वर्षी या प्रकरणात आरोपपत्र दाखल केले असून पुढील तपास सुरू आहे. रेल्वेमंत्री असताना रेल्वेत नोकरीच्या बदल्यात जमीन लिहून घेतल्याचे लालू यादव यांच्या कुटुंबीयांवर सात आरोप आहेत. या प्रकरणात लालू-राबडी यांच्यासह कुटुंबातील सातजण अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि 'सीबीआय'च्या रडारवर असने, हा योगायोग आहे. लालू यादव, राबडी देवी, मीसा भारती, रागिणी यादव, चंदा यादव, हेमा यादव आणि तेजस्वी यादव यांची या प्रकरणी चौकशी होणार आहेत.

'सीबीआय'ने राबडी देवी आणि लालू यादव यांची चौकशी केल्यानंतर 'ईडी'ने दहा मार्च रोजी देशभरात २४ ठिकाणी छापे टाकले. छाप्यांनंतर 'ईडी'च्या सूत्रांनी दावा केला होता की त्यांच्याकडून ७० लाख रुपये रोख आणि दोन किलो सोने जप्त करण्यात आले आहे. पाटणाच्या हजारी राय यांनी २००७ मध्ये एके इन्फोसिस्टम प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीला ९५२७ चौरस फूट जमीन फक्त १०.८३ लाख रुपयांना विकली. हजारी राय यांचे पुतणे प्रेमचंद कुमार आणि दिलचंद कुमार यांना रेल्वेत नोकऱ्या मिळाल्याचा आरोप आहे. २०१४ मध्ये राबडी देवी आणि मिसा भारती यांनी सर्व शेअर्स खरेदी करुन एका आस्थापनेचे नाव एके इन्फोसिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड असे ठेवले. तेजस्वी यादव यांच्या दिल्लीतील ज्या घरावर 'ईडी'ने छापा टाकला ते देखील या कंपनीच्या नावावर नोंदणीकृत आहे. पाटण्याच्या किशुनदेव राय यांनी आपली ३३७५ चौरस फूट जमीन राबडी देवींच्या नावे केली. हा सौदा अवघ्या ३.७५ लाख रुपयांमध्ये झाला होता. किशनदेव राय यांच्या कुटुंबातील राज कुमार, मिथिलेश कुमार आणि अजय कुमार या तीन मुलांची मुंबईत रेल्वेत भरती झाल्याचा आरोप आहे. पाटणा येथील संजय राय यांनी २००८ मध्ये राबडी देवी यांना ३३७५ चौरस फूट जमीन ३.७५ लाख रुपयांना विकली. या बदल्यात संजय राय यांच्या कुटुंबातील दोनजणांना रेल्वेत नोकऱ्या दिल्याचा आरोप आहे.

बिहारमध्ये सर्वात मोठा पक्ष असलेल्या राष्ट्रीय जनता दलाला घेरण्याची तयारी सुरू असताना बिहार महाआघाडीतही सर्व काही सुरळीत नाही. नितीशकुमार हे राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि इतर पक्षांसाठी चिंतेचा विषय बनले आहेत. गेल्या काही दिवसांपासून नितीशकुमार यांची पावले महाआघाडीतील इतर पक्षांपेक्षा वेगळी पडत असल्याचे दिसत आहे. भाजप नेत्यांशीही त्यांची जवळीक वाढू लागली आहे. अलिकडेच नितीशकुमार अचानक भाजप आमदाराच्या घरी पोहोचले आणि प्रसाद घेतला. चैती छठ उत्सवानिमित्त मुख्यमंत्री नितीशकुमार पाटणा येथील भाजप आमदार संजय मयुख यांच्या घरी गेले होते. ती एक शिष्टाचार भेट असल्याचे त्यांनी म्हटले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंहही संजय मयुख यांच्या घरी गेले होते; मात्र सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे नितीश यांच्या भाजप नेत्याच्या भेटीची चर्चा सुरू झाली आहे.

महाआघाडीत सर्व काही सुरळीत नाही. 'लँड फॉर जॉब' घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांवर 'सीबीआय' आणि 'ईडी'कडून कारवाई करण्यात येत आहे. यामुळे राष्ट्रीय जनता दलाने तेजस्वी यांना मुख्यमंत्री करण्यासाठी संयुक्त जनता दलावर दबाव टाकणे बंद केले आहे. दुसरीकडे, राहुल गांधी यांचे सदस्यत्व रद्द होण्याच्या तसेच शिक्षेच्या मुद्द्यावर महाआघाडीतील सर्व पक्ष एकवटले असले तरी मुख्यमंत्री नितीशकुमार मात्र मौन बाळगून आहेत. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारवर जोरदार टीका करणाऱ्या नितीश यांनी यावर अद्याप भाष्य केलेले नाही.

आजकाल

उन्हाळा रद्द होऊ शकेल काय?

राहुल बनसोडे

उन्हाळा हा ऋतु बऱ्याच लोकांना आवडत नाही. प्रचंड घाम, उष्णता, पाण्याची कमतरता आणि इतर अनेक कारणांसाठी उन्हाळा बदनाम आहे. हा ऋतु रद्द करण्यात यावा अशी मागणी सोशल मिडियावर काही जणांनी केली आहे. उन्हाळा ऋतु रद्द करणे कुणाच्याही हातात नाही पण नैसर्गिक कारणाने तो रद्द होऊ शकतो. उत्तर गोलार्धात १८१६ साली उन्हाळा रद्द झाला होता. वेस्ट इंडीज ह्या क्रिकेट खेळणाऱ्या देशाचे आपल्याला ठाउक आहेच त्याचाच भाउ इस्ट इंडीज हा देश. तर ह्या इस्टइंडीजमध्ये तंबोरा नावाचा एक मोठा पर्वत आहे आणि ह्या पर्वतातला एक ज्वालामुखी फुटला. हा ज्वालामुखीच्या फुटण्याची शक्ती इतकी तीव्र होती की त्यामुळे हजारो किलोमिटरच्या परीसरात तांबड्या रंगाची धुळ अवकाशात दुरवर पसरली. ह्या धुळीमुळे सुर्याची किरणे पृथ्वीपर्यंत पोहचु शकली नाहीत आणि मग त्यामुळे उन्हाळा येऊ शकला नाही. शिवाय उत्तर गोलार्धाचे सरासरी तापमान अर्धा डिग्री ते एक डिग्रीने कोसळले. सुर्यप्रकाशाची कमतरता आणि वाढलेली थंडी ह्यामुळे उत्तर गोलार्धातल्या अमेरीकेसारख्या देशात कोरडे धुके पडले जे कितीतरी दिवस हलले नाही आणि लोकांना मध्यान्हीचा सुर्याकडे थेट उघड्या डोळ्यांनी पहाता येत होते. स्थानीक भागांमध्ये नंतर थंडी इतकी वाढली तीने झाडे आणि त्यांची मुळेदेखील गोठवुन टाकली, पिकांवर त्याचा फार गंभीर परिणाम झाला. अमेरीकेला दिर्घ हिवाळ्यांची सवय होती पण पिकांचे इतके अतोनात नुकसान झाले की त्यामुळे हिवाळी दुष्काळ पडला. हे नुकसान इतके मोठे होते की नुकत्याच सेवानिवृत्त झालेल्या थॉमस जेफरसन ह्या राष्ट्राध्यक्षाला सुद्धा कर्जबाजारी होण्याची वेळ आली. पिक अपयश (Crop Failure) ही संकल्पना प्रथमच अस्तीत्वात आली आणि पिके अपयशी झाल्यास शेतकर्यांची कर्जसमस्या कशी गंभीर होऊ शकते याचा जगाला प्रत्यय आला. अमेरीकेचा राष्ट्रपिता पुन्हा शेतकरी बनला तेंव्हा कर्जबाजारी झाला आणि कर्जातच मेला.

१८१६ सालच्या रद्द झालेल्या उन्हाळ्यात आयर्लंडमध्ये प्रचंड अन्नटंचाई निर्माण झाली आणि कित्येक श्रीमंत लोकांनाही निर्वासीत बनुन शेकडो किलोमीटर पायी चालुन अन्नासाठी भीक मागावी लागली. जर्मनीत अन्न इतके महाग झाले की बेकरी आणि धान्यांच्या दुकानांसमोर लोकांनी मोठ्या संख्येने निदर्शने केली ज्याचे पर्यावसन नंतर दंगल, लुटालुट आणि जाळपोळीत झाले. स्वीझर्लंडमधली गीट्रो ह्या हिमनदीच्या मागे एक मोठे बर्फाचे धरण तयार झाले. दोन वर्षानंतर ते जेंव्हा फुटले तेंव्हा आतोनात हानी झाली. चीनमध्ये भातशेतीचे तर नुकसान झालेच पण पाण्यातल्या पाळीव म्हशी देखील मृत्यमुखी पडल्या. माउंट तंबोराच्या ज्वालामुखीमुळे आशियातले मान्सुनचे चक्र पुर्णतः कोसळले. भारतात प्रचंड मोठ्या प्रमाणात अवकाळी पाउस झाला, अवकाळी पाउस भारताला किती नुकसानकारक ठरु शकतो ह्याचा पहिला धडा आपण तिथे घेतला. ह्या पावसाचे पाणी सखल भागात साचुन राहिल्याने गंगेच्या खोऱ्यात आणी बांग्लादेशात कॉलराची साथ पसरली जी वाढत जाऊन थेट रशियापर्यंत पोहचली. आर्यलंडमध्ये टायफॉईडची न भुतो न भविष्यती अशी साथ आली ज्यात कित्येकांचा जीव गेला.

ह्या काळात काही लोकांनी सुर्यास्ताची काढलेली चित्रे ही इतर सुर्यास्तांच्या चित्रांपेक्षा वेगळी असल्याने ती खास मानली जातात. जर्मनीत ओटस नसल्यामुळे घोडे पाळणे अशक्य झाले आणि घोडागाड्या बंद झाल्या. ह्या अडचणीतुन पहिल्या सायकलचा शोध लागला असे मानले जाते. ह्याच काळात अमेरीकेतल्या अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सोडुन वेगवेगळ्या भागांमध्ये स्थलांतर केले. इंडियाना हे नवे राज्य अस्तीत्वात आले आणि लवकरच इलुनॉय ह्या दुसऱ्याराज्याचीही स्थापना झाली. दुष्काळामुळे काही लोकांनी कृत्रिम खतांचाही शोध लावला. १८१६ साली उन्हाळा रद्द झाल्यामुळे उत्तर गोलार्धात अनेक जैविकभुबदल घडुन आले. राजकारणाची दिशा बदलली आणि लाखो शेतकरी देशोधडीला लागले, कित्येकांचे प्राण गेले.

उन्हाळा रद्द व्हावा ही कल्पना वाटते तितकी सरळसोपी नाही.

व्हायरल

डीजे लावून नाचतील नाहीतर काय...

तरुण सळसळतं रक्त आहे...

यांना नोकऱ्या नाही... सरकारी परीक्षा शुल्क भरून परीक्षा होत नाहीत. UPSC मध्ये लेटरल नियुक्त्या सुरु केल्याने तिथेही आता गर्दी आहे...

धंदा व्यवसाय करावा तर व्यावसायिक शिक्षण नाही. छोटा मोठा धंदा करावा तर पदवी पुढे शिक्षण घेतलेलं...त्यामुळे छोटा धंदा केला तर लोक काय म्हणतील.. बाबूच्या नोकरीची अपेक्षा असते आणि अंगमेहनत करण्याची सवय नाही. आई बापाने कमावून ठेवलेला पैसा असतो, घर असतं.. आई बापाचे पगार किंवा पेंशन असते.... २ वेळ जेवायची भ्रांत नसते... डोक्यावर छप्पर असतं..

पण नोकरी धंदा नाही त्यामुळे छोकरी मिळत नाही... छोकरी नाही त्यामुळे शरीरातल्या हार्मोन्सचा निचरा नाही... घरी गेलं तर रिकाम्या फिरणाऱ्या मुलाकडं आईबाप विचित्र नजरेने बघणार.. मग राग चिडचिड उद्विग्नता.. मग घराबाहेर रहाणं... बाहेरही बेकार मित्र एकत्र येणं. व्यसनात बुडून जाणं..

आयुष्याला योग्य दिशा मिळत नसल्याची चिड मग कुठे बाहेर काढणार?? डिज्जेच्या तालावर हीच तरुणाई बेधुंद होणार...

आवाज वाढव डिज्जे म्हणत काही काळ सगळा ताण विसरणार...लवकरच राम मंदिर उभारलं जाईल...

सगळी बेकार मंडळी रस्त्यावर उतरवली जाणार...

तोवर यांना कुठेही काम मिळणार नाही याची सरकार काळजी घेणार...जगायला अन्न वस्त्र निवारा लागतो त्याची सोय काँग्रेसच्या जमान्यात झालेली असते...तेंव्हा आता धर्माचा झेंडा खांद्यावर घेणार..

आता फक्त धर्म धर्म करत तरुणाई सडवली जाणार... डिज्जे लावून नाच न् करतील तर काय करतील...धर्माच्या अफूचा अंमल कसा उतरवणार???

- छाया थोरात

पृथ्वीवर आलेला कुठलाही माणूस आदर्श आणि परिपूर्ण नसतो, प्रत्येकात काहीतरी त्रुटी असते. एखाद्या माणसाचे एका विशिष्ट घटना,गोष्टीबद्दल विचार तुम्हाला पटत असतील, दुसऱ्या बाबतीत पटत नसतील. एका घटनेपुरत त्या माणसाशी सहमत होणं वेगळं आणि तुमची जीवनमूल्य असणं वेगळं. प्रतिक्रिया, विचार तत्कालिक असतात,त्यात बदल होतात, जीवनमूल्य चिरंतन असतात, तुमची जीवनमूल्य नेमकी काय आहेत? स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता, प्रेम, सलोखा, एकता? तुमच्या डोक्यातला गुंता आधी सोडवा.

तुम्हाला एकाच वेळी शिवाजी महाराज आदर्श वाटत असतील आणि त्यांच स्वराज्य 'काकतालीय न्याय' म्हणणारा सुद्धा आदर्श वाटत असेल तर तुम्ही गंडलेले आहात. स्त्रियांचा सन्मान करणारे छत्रपती शिवाजीमहाराज तुमचे आदर्श असतील तर शिवाजी राजांनी शत्रूस्त्रियांचा अनादर न करणे हि सद्गुण विकृती म्हणणारा तुमचा आदर्श कसा असेल? तुम्ही एकाच वेळी अखंड भारताच्या पिपाण्या वाजवता आणि त्याच वेळेला द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडणारा तुमचा आदर्श वाटत असेल तर तुम्ही गोंधळून गेलेले आहात. गोवंश हत्याबंदी कायदा करणार आणि गोसेवा आयोग नेमणार सरकार तुमच्या आवडीचे आणि दुसरीकडे गायीला उपयुक्त पशु म्हणणाऱ्या माणसाला आदर्श मानत असाल तर इथे तुम्ही गंडलेले आहात. गल्ली ते दिल्ली तुमची निरंकुश सत्ता असताना, संपूर्ण बहुमत असताना तुमचा राजा साध भारतरत्न तुमच्या आदर्शाला जाहीर करू शकत नाही याचा अर्थ तुम्हाला कळतो का ? तुमचा कथित आदर्श फक्त एक प्रांतिय चलनी नाणं आहे जे राजकीय फायद्यासाठी वापरलं जातं. अपमान झाला अपमान झाला म्हणून कोल्हेकुई करणारा एकही हरीचा लाल झालेले आरोप पुरावे देऊन खोटे आहेत हे सिद्ध करत नाही. याचा अर्थ तुम्हाला कळतोय का ?

तुमच्या मेंदूत लोच्या झालेला आहे.

तुमच्या खांद्यावर तुमचंच डोकं आहे हे कधी सिद्ध करणार ?

- आनंद शितोळे

लोकसंसद

'प्रिन्स सलीम' काळाच्या पडद्याआड

आपल्या तडाखेबंद फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या अष्टपैलू क्रिकेटपटू सलीम दुरानी यांच्या निधनाने भारतीय क्रिकेट विश्वातील एका पर्वाचा अंत झाला. ११ डिसेंबर १९३४ रोजी अफगाणिस्तानातील काबुल येथे जन्मलेल्या सलीम दुरानी यांनी भारतीय क्रिकेट संघातून १९६० ते १९७३ या कालावधीत एकूण २९ कसोटी सामन्यात भाग घेतला होता. त्यांनी कसोटीत १२०२ धावा केल्या तसेच एका सामन्यात १७७ धावांत १० बळी या सर्वोत्तम गोलंदाजीसह त्यांनी एकूण ७५ बळी घेतले देशातील प्रतिष्ठेच्या रणजी करंडकासाठी खेळताना त्यांनी सौराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान संघांचे प्रतिनिधित्व केले. प्रेक्षक जेथे सांगतील तेथे षटकार ठोकणारे चाहत्यांचे लाडके व अत्यंत दिलदार स्वभावाचे असलेले सलीम दुरानी 'प्रिन्स सलीम' या नावाने क्रिकेट वर्तुळात ओळखले जात. कानपूर येथे १९७३ साली त्यांना कसोटी सामन्यातून वगळण्यात आल्यानंतर चाहत्यांनी 'नो दुरानी, नो टेस्ट' असे फलक झळकावले होते. १९६१ मध्ये अर्जुन पुरस्कार मिळवणारे ते पहिले क्रिकेट खेळाडू होते. तसेच २०११ मध्ये बीसीसीआयचा सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कारही त्यांना मिळालेला आहे. १९७३ मध्ये क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी 'चरित्र' नावाच्या हिंदी सिनेमातही काम केले होते. त्यांना भावपूर्ण आदरांजली!

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

वाचणारा वेळ

अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट.

कन्फ्यूशियस हा तत्त्ववेत्ता एका दुर्गम गावात गेला. तिथे एका शेतात एक शेतकरी आणि त्याचा मुलगा रहाटाला स्वत:ला जुंपून घेऊन विहिरीतून पाणी खेचत होते. मातीची मोठी मडकी विहिरीत जात येत होती.

कन्फ्यूशियस जाऊन त्या म्हाताऱ्याला म्हणाला, अरे, जग किती पुढे गेलंय याची तुला काही कल्पनाच नाही की काय? आता रहाटाला बैल जुंपले जातात. रहाटाला धातूची भांडी लावली जातात पाणी उपसण्यासाठी. तू यातलं काहीच का वापरत नाहीस?

म्हातारा म्हणाला, त्याने काय होईल? कन्फ्यूशियस म्हणाला, तुझा वेळ वाचेल. मुलाचा वेळ वाचेल. म्हातारा म्हणाला, हळू बोल. असल्या पाखंडी कल्पना माझ्या मुलाच्या डोक्यात शिरल्या तर पंचाईत होईल. अरे, आता आम्ही दिवसभर रहाट ओढतो, तरी जो काही तुटपुंजा वेळ मिळतो, त्याचं काय करायचं हे आम्हाला कळत नाही. तुझी ती आधुनिक साधनं वापरून मिळालेल्या वेळात काय एकमेकांच्या तोंडाकडे बघत बसायचं का? अनेक वर्षांनी कन्फ्यूशियस पुन्हा त्या गावात गेला. तिथे तोच म्हातारा, त्याच मुलाला घेऊन तसाच पाणी शेंदत होता. कन्फ्यूशियस काही बोलणार इतक्यात तो म्हातारा म्हणाला, तू मला फार फार तर बैल आणि धातूची भांडी यांच्याबद्दलच सांगणार होतास ना? कन्फ्यूशियसने मान डोलावली. म्हातारा म्हणाला, जग त्याच्याही पुढे गेलं आहे. मी तर या विहिरीवर इलेक्ट्रिक मोटरही बसवली होती. कन्फ्यूशियस म्हणाला, मग? म्हातारा म्हणाला, मग आम्हाला खूप रिकामा वेळ मिळू लागला. आम्ही दोघांनी दोन मोबाइल घेतले. मी व्हॉट्सअपवर रमलो, मुलगा फेसबुकमध्ये बुडाला. मोटरने सगळी विहीर उपसून काढली, सगळं शेत वाहून गेलं. खायचे वांधे झाले. त्यामुळे दोन्ही मोबाइल विहिरीत फेकून दिले आणि पुन्हा मूळपदावर आलो. हिर्रर्र हुईईई त्याने मुलाला आवाज दिला दोघे चालू लागले रहाटगाडगं सुरू झालं.

-ओशो

निवडक

भाई संगारेंचा स्मृतिदिन

पनवेल : स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे यांच्या अध्यक्षतेखाली दलित पँथरचे नेते भाई संगारे यांचा २४ वा स्मृतीदिन वडाळा येथे पक्षाच्या मुख्य कार्यालयात संपन्न झाला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरी चळवळीसाठी समर्पित केले होते. त्यांच्या २४ व्या स्मृती दिनाच्या कार्यक्रमाकरिता महासचिव अशोक वाघमारे, संघटक भगवान गरुड, वरळी विभागाच्या अध्यक्षा रेणुका तांबे आदींनी मनोगतात त्यांच्या कार्याची माहिती दिली.

पालखी सोहळा उत्साहात

पनवेल : पनवेलची आराध्य दैवत जाखमाता देवीचा पालखी सोहळा मोठ्या जल्लोषात व ढोलताशाच्या गजरात संपन्न झाला. नवसाला पावणारी व रोगराईपासून भक्तांचे रक्षण करणाऱ्या जाखमातेवर पनवेलवासियांची अपार श्रद्धा आहे. मोठ्या भक्तीभावाने अनेक वर्षांपासून हा पालखी सोहळा साजरा केला जातो. यावेळी नवस फेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. ठिकठिकाणी जाखमाता देवीचे माताभगिनींनी स्वागत व औक्षण करत आरती केली.

पनवेल : अज्ञाताचा मृतदेह

पनवेल : रेल्वे स्टेशन परिसरातील लोकल लाईन समोरिल रिक्षा स्टॅन्डजवळ एका अनोळखी इसमाचा मृत आढळला असून, पनवेल रेल्वे पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे असून, उंची ५ फूट ५ इंच, अंगाने सडपातळ, रंग गहूवर्ण, डोकीचे केस काळे पांढरे वाढलेले, नाक सरळ, चेहरा उभट तसेच अंगात अंगात निळ्या रंगाचा फुल बाह्यांचा टी शर्ट व निळ्या रंगाची फुल पॅन्ट आतमध्ये राखाडी रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे.

प्रकाश चांदिवडेंची नियुक्ती

पनवेल : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिव सहकार सेनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये कळंबोली येथील ज्येष्ठ शिवसैनिक प्रकाश चांदिवडे यांची कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, शिव सहकार सेनेच्या अध्यक्षपदी शिल्पा सरपोतदार यांची तर सरचिटणीसपदी प्रकाश शिरवाडकर, संदीप तांबे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

भाविकांचे श्रद्धास्थान

उरण : चिरनेर व रानसई ग्रामपंचायतीच्या प्रवेशद्वाराजवळील निसर्गाच्या सान्निध्यातील बापुजी देवस्थान हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील तसेच परिसरातील हजारो भाविकांचे ग्रामदैवत असल्याने अनेक भाविक कुटुंबासह बापुजी देवस्थान येथे दर्शनासाठी, नवस फेडण्यासाठी गर्दी करत असतात. मोकल परिवाराच्या वतीने येथे जत्रोत्सवाचे औचित्य साधून मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दिन वार्ता

पंचांग
३ एप्रिल २०२३, सोमवार
विक्रम संवत२- २०७९
चैत्र शके संवत२- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तराणायन
मास- चैत्र,ऋतु- वसंत,शुक्ल पक्ष
तिथि:द्वादशी ०६:२४:३५
नक्षत्र:मघा ०७:२३:५१
योग:गण्ड २७:४०:०३+
करण:बालव ०६:२४:३५
करण:कौलव १९:१८:२०
सूर्य:मीन,
चन्द्र:सिंह
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - रमजान
तारीख - ११
विशेष
सोमप्रदोष
अनंग त्रयोदशी
अनंगव्रत
महावीर जयंती

सुडोकू

2	3					5		7
9	1			3	4			2
6				9				4
	4	9			6		8	3
				8				
3	6		1			9	2	
4				7				8
8			4	5			1	6
5		6					7	9

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

5	9	6	4	3	8	2	1	7
7	3	8	1	2	6	9	4	5
1	4	2	5	9	7	3	6	8
8	7	5	2	6	3	1	9	4
9	6	4	7	5	1	8	2	3
2	1	3	8	4	9	5	7	6
6	8	9	3	1	4	7	5	2
3	2	1	6	7	5	4	8	9
4	5	7	9	8	2	6	3	1

रस्त्याला उदघाटनाची प्रतीक्षा

भिसेगाव ते चारफाटा रस्त्याचे काम पूर्ण; आता वाहतूक कधी सुरू होणार?

। नेरळ । प्रतिनिधी ।
कर्जत नगरपरिषद हद्दीमधील कर्जत चारफाटा ते भिसेगाव या ४०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम गेली अडीच वर्षे झाल्यावर पूर्ण झाले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून या रस्त्याचे काम आता पूर्ण झाले असून, या रस्त्यावरून वाहतूक सुरू करावी, अशी मागणी जय अंबे रिक्षा संघटना यांच्याकडून करण्यात आली आहे.

कर्जत शहरातील भिसेगाव या रहिवासी क्षेत्राला जोडणारा कर्जत चार फाटा येथील ४०० मीटर रस्त्याचे आरसिसी काँक्रिटीकरण करण्याचे काम २०२१ मध्ये मंजूर झाले होते. त्या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी जून २०२१ रोजी कार्यादेश संबंधित ठेकेदार कंपनीला देण्यात आले होते. मात्र, ठेकेदार बांधकाम सुरू करीत नसल्याने स्थानिक रहिवासी आणि नगरसेवक यांनी उपोषण केले होते. त्यानंतर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. परंतु, रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन झाल्यानंतरदेखील रस्त्याचे काम रखडल्याने गेली दोन वर्षे रखडले होते. त्यावेळी रस्त्याचे काम व्हावे आणि या रस्त्यावरून येणारी एसटी गाडी तसेच इतर वाहनांची वाहतूक सुरू व्हावी, अशी मागणी पुढे करीत स्थानिक तरुणांनी उपोषण सुरू केले होते.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून या रस्त्याच्या कामासाठी साडे चार कोटींचा निधी मंजूर

होता. रस्त्याचे कामाचे कार्यादेश लक्षात घेता मार्च २०२३ मध्ये या रस्त्यातील साकव पूलदेखील बांधून पूर्ण झाला आहे. त्यामुळे या रस्त्यातील दुभाजकमध्ये माती टाकून झाडे लावण्यासाठी क्षुल्लक कामे पालिकेने संबंधित कामाचे ठेकेदारास सांगून त्वरित पूर्ण करावी, असे आवाहन स्थानिक नागरिक करीत आहेत. या रस्त्याने कर्जत रेल्वे स्थानक असून, रेल्वेसाठी येणारे प्रवासी यांची वाहने दोन वर्षे या रस्त्याने येत नव्हती. त्यात कर्जत एसटी आगारदेखील याच भागात गुंडगे येत असून, त्या ठिकाणी आहे. रस्ता बंद असल्याने उपनगरीय लोकल पकडण्यासाठी मोठा फेरा मारावा लागत आहे. त्याचवेळी एसटी गाड्या त्या भागातून येत नसल्याने प्रवासी संख्यादेखील कमी झाली असून, रिक्षाचालक यांनादेखील प्रवासी मिळत नाहीत. त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने कर्जत नगरपालिकेने त्यात लक्ष घालून लवकरात लवकर रस्त्यावरून वाहतूक सुरू करण्यासाठी हालचाली करण्याची मागणी जय अंबे रिक्षा संघटनेने केली आहे.

आधी रस्ता पूर्ण करा, मग टोल घ्या : जोग

। कोर्लई । वार्ताहर ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग एनएच-६६, पळस्पे ते इंदापूर रस्ता, वडखळ-अलिबाग रस्ता व सर्विस रस्ता अत्यंत खराब, साईन बोर्ड, अयोग्य स्पीड ब्रेकर्स, अपुऱ्या उंचीचे डीव्हायडर्स, पेव्हर ब्लॉक्स, पथदिवे आदी योग्य झाल्याशिवाय झाल्याखेरीज टोल आकारण्यात येऊ नये, अशी मागणी अलिबाग येथील दिलीप जोग, समीर पालकर व अनुज पालकर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या प्रकल्प अधिकारी यांना निवेदनातून केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग एनएच-६६च्या तसेच वडखळ रस्ता व सर्विस रस्ते यांच्या दुर्दशेबाबत विशेष करून पळस्पे ते इंदापूर टप्प्यामध्ये संपूर्ण रस्ता सुव्यवस्थित करण्याकरता आम्ही वेळोवेळी आंदोलने केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आपले खाते लबाडीने टोल वसुलीच्या मागे लागले आहे. याचा आम्ही निषेध करत असून, वरील रस्त्यांची कामे पूर्ण झाल्याशिवाय टोल घेऊ नका, अशी मागणी दिलीप जोग व सहकाऱ्यांनी केली आहे.

कर्जतमध्ये उद्या सावरकर गौरव यात्रा

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यात सरकारी असलेल्या शिवसेना भाजप युतीने स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे.ती यात्रा कर्जत विधानसभा मतदार संघात काढण्यात येणार असून, चार आणि पाच एप्रिल रोजी ही यात्रा प्रमुख शहरात आणि ग्रामीण भागात फिरणार आहे. याबद्दल युतीच्या कार्यकर्त्यांनी नियोजन सभा घेऊन सावरकर गौरव यात्रा मोठ्या उत्साहात करण्याचे नियोजन केले आहे.

या गौरव यात्रेसाठी कर्जत विधानसभा मतदार संघातील नियोजनाची आढावा बैठक आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कर्जत पोसरी येथील सुरभी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. त्यावेळी आमदार थोरवे यांच्यासह शिवसेना पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख विजय पाटील, संतोष भोईर, भाई गायकर, संभाजी जगताप, शिवराम बदे, पंकज पाटील तसेच भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, उपाध्यक्ष वसंत भोईर, मंगेश म्हसकर, रमेश मुंढे, तसेच किसान मोर्चाचे सुनील गोगटे, अनंत धुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाड तालुका रिक्षा युनियनच्या अध्यक्षपदी रोहित पाटील

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाड तालुका रिक्षा युनियनला सुमारे चाळीस वर्षांचा इतिहास असून, आजही युनियन त्याकाळात होती, तितकीच मजबूत आहे. युनियनमध्ये अनेकांनी फूट पाडण्याचे असफल प्रयत्न केलेले आहेत. मात्र, आपल्या रिक्षा युनियनची एकजूट अभेद्य होती, आहे आणि कायम राहणार, असे प्रतिपादन महाड तालुका रिक्षा युनियनचे अध्यक्ष रोहित रवींद्र पाटील यांनी केले.

महाड तालुका रिक्षा युनियनची वार्षिक सर्वाधारण सभा नुकतीच शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील बहुउद्देशीय सभागृहात संपन्न झाली. यावेळी प्रामाणिक रिक्षा चालकांचा गौरवपत्र देऊन सत्कार

करण्यात आला. रिक्षातून प्रवास करताना अनेकवेळा प्रवासी आपल्या मौल्यवान वस्तू विसरून जातात. अशावेळी युनियनमधील रिक्षाचालक सदरच्या वस्तू इमाने इतबारे परत करतात. यामध्ये अनेक रिक्षा चालकांनी महागडे मोबाईल, सोन्याच्या चैन, गंठण, पैशाची पाकिटे तर प्रसंगी लाखो रुपयांची रोख रक्कमदेखील परत केलेल्या आहेत. प्रामाणिकपणाचा समाजापुढे आदर्श निर्माण केलेल्या अठरा रिक्षचालकांचा युनियनमार्फत गौरव करण्यात आला. या सभेत जमा खर्चाचा तपशील जाहीर करण्यात आला. तसेच विविध विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात आले. यावेळी युनियनच्या तालुका सचिव पदी श्री. शेखर सावंत यांची एकमताने निवड झाली. तसेच राजेश रांजणकर व संदीप सकपाळ यांची अनुक्रमे राम मंदिर व चवदार तळे रिक्षा स्टॉप्सच्या स्टॉप अध्यक्षपदी निवड झाली.

या सभेला युनियनची तालुका कार्यकारिणी, सर्व स्टॉप अध्यक्षांसह दोनशेच्यावर सभासद उपस्थित होते. महाड तालुका रिक्षा युनियनमध्ये यापुढे जास्तीत जास्त सभासद होण्याचे आवाहन आणि आभारप्रदर्शन मावळते सचिव सुधाकर पालांडे यांनी केले.

'काँग्रेस नेत्यांच्या बदनामीचा भाजपचा डाव'

। रसायनी । वार्ताहर ।

देशात महागाई, बेरोजगार, भ्रष्टाचार असे अनेक मुद्दे आहेत, त्यावर भारतीय जनता पार्टी किंवा केंद्र सरकार काहीच बोलायला तयार नाही. मात्र, नको ते कारण दाखवून काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना बदनाम करण्याचा भाजपचा डाव असल्याचा आरोप रसायनी येथील काँग्रेसचे खालापूर तालुकाध्यक्ष कृष्णा पारंगे यांनी केला आहे.

आम्ही सर्व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते या हुकुमशाही, स्वार्थी

वृत्तीचा जाहीर निषेध करतो. भाजपतर्फे लोकशाहीचा खून होत असून, आम्ही काँग्रेस नेत्यांचा अपमान खपवून घेणार नाही, असे परखड मत पत्रकार परिषदेत कृष्ण पारंगे यांनी व्यक्त केले.

उद्योगपती अदाणी समुहातील शेल कंपन्यांची वीस हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सरकारला धारेवर धरल्यामुळे मोदी सरकारने राहुल गांधींवर निलंबनाची कारवाई केली ती लोकशाही विरोधातील असून, याचा देशभरातील काँग्रेस पक्ष निषेध करीत असल्याचे काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस प्रमोद राईलकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष निखिल डवळे यांनी बोलताना सांगितले.

तलावातून मगरीला काढण्यात यश

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या चिकणी पुलाजवळील कृत्रिम तलावातून मगरीला सुखरुप बाहेर काढण्यात यश आले आहे.

चिकणी गावापासून काही अंतरावर मुख्य रस्त्यालगत पुलाजवळील शेजारी कृत्रिम तलावात मगर वास्तव्य करीत असल्याचे नागरिकांनी पाहिल्यानंतर याठिकाणचे ग्रामस्थ भयभीत झाले होते. ही माहिती मिळताच सर्पमित्र संदीप घरत यांनी याठिकाणी जाऊन पाहणी केली असता. त्यावेळी नदीच्या पाण्यातून मगर तलावाकडे जाताना दिसली. त्यांनी तलावात दोन पाण्याचे पंप लावून पाणी कमी करण्याचा प्रयत्न केला; परंतु पाण्याचा प्रवाह कमी होत नसल्याने मगर काढण्यात

अपयश येत होते. अखेर ठाणे येथील मानद वन्यजीव रक्षक व डब्ल्यूडब्ल्यूए संस्थेला प्राचारण करण्यात आले. अथक प्रयत्नांनंतर मगरीला तलावातून सुखरुप बाहेर काढण्यात यश आलं. तिला महाड येथील सावित्री नदीत सोडण्यात येणार असल्याची माहिती वन अधिकारी यांनी दिली.

यावेळी मुरुड तहसीलदार रोहन शिंदे, वनक्षेत्रपाल मनोज वाघमारे, मानद वन्यजीव रक्षक ठाणे रोहित मोहिते, डब्ल्यूडब्ल्यूए सदस्य अभिजीत मोरे, वनपाल विजय कोसबे, सर्पमित्र संदीप घरत, वनपाल संपोष रेवणे, वनरक्षक पंढरीनाथ दिघे आदींसह वन अधिकारी यांनी मोलाची कामगिरी बजावली.

शब्दकोडे क्र.८५



आडवे शब्द : २. किरकोळ४. नशीब उघडणे६. गाठलेली समान उंची८. कोंबड्याचे शिरोभूषण९. सगळे१०. सागर११. डिंक१२. भीतीची लहर१३. सगळे काही ठीक!१४. मोत्याचे जन्मस्थान१६. बोट, नौका१८. नागासमोर गारुडी हे वाद्य वाजवून दाखवतात१९. मूलभूत, पहिल्या टप्प्यातील शिक्षण इ.२०. गर्दीतील रिकामटेकडे प्रेक्षक२१. फालतू माणूस२४. खिशातही मावणारे छोटे कुंफ्कवाद्य२५. आनंद२७. तनू२८. राजा किंवा मोठ्या व्यक्तीच्या आगमनाचीदरबारातील सेवकाने दिलेली सूचना३०. केरसुणी, खराटा३२. चोर-दरोडेखोरांचा उपद्रव३५. मार्ग३६. परीक्षा३८. घोंगडी३९. गूढ, खोल४१. माळेतील मणी४२. धार्मिक प्रवासी४३. निधन४४. जीवाणूंवर उपाय सापडला, पण अजून यावर नाही! ४५. क्षमता४६. पडवी४८. गद्दारी४९. सत्त्व५१. परंतु५२. कापसाचे बी५३. वायुदेवता५४. पाणी पिण्याचे अरूंद तोंडाचेघाटदार पात्र५६. त्वरित५९. गुण ओळखण्याची क्षमता६०. जाणकार६२. बहुसंख्य वस्तूंचा मोठा ढीग६४. नौका६६. थाटमाट६८. सजावट७०. साचा७३. महिना७५. नांगर७७. गायकाला साथ करणारा अथवा समूहाने गाणारागायकवृंद७८. गणेशोत्सवाचामहिना८१. परवानगी, संमती८३. झोपडी८५. स्वत:ला८७. अतिशय जड८८. अतिशय जुने८९. मौल्यवान सामानसुमान९०. नवनीत९१. जागरूक९२. विष्णू९४. जहाज९६. चोळीचे कापड ९७. झाड९९. आग्रही१००. परिप१ न झालेला१०१. केव्हा१०२. लाज१०३. डोंगरसारखा प्रचंड१०४. उठाव१०५. हवेली

उभे शब्द: १. 'राजास जी महाली सौख्ये कधी मिळाली....' ३. विपुल४. पत्नी५. दहा ओळी असलेला काव्यप्रकार६. दुष्कीर्त६अ. दृष्टी वळवण्याची विनंती७. फीत (इंग्रजी)८. अपुरा, तोकडा१०. पक्ष बदलणारा नेता१३. गणपतीचे एक नाव१५. सगळ्यांत अतिशय प्रिय१७. पिता, वयाने मोठा२२. दयाळू२३. वर्तन, संस्कार२४. लहान२६. अस्थमा२९. खोळंबा, नुकसान३१. मेंढीचे पिल्लू३३. शेकडा प्रमाण३४. ताकद३७. चटावलेला३८. वक्र४०. अधिकार४१. बुरखा४३. कृष्णाची आई४४. पक्षी४६. चरा४७. युवक५०. शल्य५२. माळ, बरोबरी५३. बिशाद, हिंमत५५. वैरभाव५७. इंद्राचे शस्त्र५८. हलके, क्षुद्र५९. जल६०. डौलदार६१. कहर, अतिरेक६३. सेना, टोळी६५. आवड६७. थोरवी६९. पावसाची झड७१. बैठक, सद७२. विहीर७४. माणूस७६. कान७७अ. आकलनशक्ती९. धन८०. एक्का, बैलगाडीचा टप असलेला प्रकार८१. ज्ञात८२. मातीचे छोटे भांडे८३. पान८४. कपटी८६. रूपवान स्त्री८७. बोकड८८. प्राण८९. कुस्तीत हरलेला९०. निखालस थाप९१. यशस्वी९३. धावण्याची स्पर्धा९४. दोस्ती, मैत्र९५. भांडण९८. सौंदर्य९९. घोडा

शब्दकोडे क्र.८४ चे उत्तर

आडवे उत्तर
१.घरसोड ५.छाया ६.गुलाबकावली १०.परिणय ११.मौल्यवान१४.नग १६.रिवाज १८.शैथिल्य १९.नावीन्य २१.फुकट २३.बेशक२४.सालस २५.रोग २६.हलका २८.सफल ३०.लव ३३.राव ३४.वारूणी३५. वन ३६.हिरडा ३७.बहुश्रुत ३९.कलंक ४०.मर्द ४१.मरण४२.खस्ता ४३.फार ४४.सडपातळ ४६.गवा ४७.अवनती ५१.गाज५२.अचाट ५३.टकळी ५५.अंगरखा ५८.वंदनीय ६०.घागर ६२.बाण६३.कलश ६५.डबर ६७.होतकरू ७०.पटु ७१.खार ७२.साथ ७४.शिवराळ ७५.पती ७६.वरमाई ७९.वाजवी ८१.ढोली ८२.आड८३.थर्मास ८४.लगाम ८६.शरम ८८.प्राबल्य ८९.ढिसाळ ९०.सिंहकटी ९२.रातोरात ९३.हेला ९४.पंचकर्म ९५.भुई९६.दाणेदार ९९.जन १००.भूक १०१.खाजा १०२. शिरकाव१०३अपहार १०४.हमी

उभे उत्तर
१.धरित्री २.रण ३.सोयरिक ४.तुल्य ५.छान ७.लय ८.कासावीस९.लीन ११.मौज १२.वाळा १३.पथिक १५.गर्भगळीत १७.वाटसरू१८.शैशव १९.नालस्ती २०.पोहरा २१.फुका २२.फोल २३.बेलन२७.लवकर २९.फणी ३१.हरण ३२.बहु ३४.वाकस ३५.वर्दळ ३६.हिरवा३७.बस्तान ३८.श्रुत ४०.मतभेद ४१.मगज ४२.खवट ४५.डफ ४७.अचार४८.तीट ४९.गोळी ५०.शिर ५१.गायब ५२.अगर ५४.कडक ५५.अंबा५६.गणपनी ५७.खाक ५८.वंश ५९.नीडर ६१.अहोरात्र ६४.लकेर६६.रसा ६८.तळ ६९.रूमाली रोटी ७१.खाई ७३.थवा ७४.शिवीगाळ७५.पराशर ७६.वड ७७.माशी ७८.निर्माल्य ८०.जलसा८२.आमराई ८३.थबकणे ८५.दाहक ८७.स्वैराचार ८९.ढिला९०.सिंचन ९१.कर्मभूमी ९३.हेर ९४.पंजर ९५.भुजा ९६.दाव९७.दाटी ९८.तूप

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. कै. गजानन शांताराम तांडेल, स्मरणार्थ, मधला पाडा, अलिबाग कोळीवाडा

'एकादशी कट्टा'ला वाढता प्रतिसाद

गजर कीर्तनाचा, उत्सव अध्यात्माचा

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।
धकाधकीच्या जीवनात मनशांती देणाऱ्या व प्रबोधनाचा मार्ग दाखविणाऱ्या अध्यात्मिक सुखापासून अनेकजण दूर चालले आहेत. माणसापासून आणि माणुसकीपासून फारकत घेतलेल्या समाजाला योग्य मार्ग दाखविण्याची शक्ती कीर्तनात आहे. त्यामुळेच अध्यात्मिक सुखाचा आनंद व आस्वाद मिळावा, समाजमनात अध्यात्माची गोडी निर्माण व्हावी व ओढ लागावी याबरोबरच समाज प्रबोधन व्हावे, गावाचा विकास साधावा यासाठी दुरशेत गावात प्रत्येक महिन्याच्या कृष्ण एकादशीला हरिकीर्तनाची मालिका चालू करण्यात आली आहे. याला 'एकादशी कट्टा' हे नाव देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, गावातील तरुणांनी यासाठी पुढाकार घेतला आहे.

तरुणांना लागली प्रबोधन व कीर्तनाची गोडी

या कीर्तन मालिकेचे लोकांकडून विशेष कौतुक होत आहे. पुण्यस्मरण, वाढदिवसनिमित्त लोक कीर्तन सेवा घेत आहेत तरुणांनी चालू केलेल्या या उपक्रमाचे कौतुक म्हणून आजवरच्या कीर्तनकारकांनी कोणतेही अनुदान घेतले नाही. उलट, या उपक्रमाविषयी आदर भाव म्हणून कीर्तनकार स्वतः देणगी देत आहेत. अशा या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे पंचक्रोशीत नव्हे तर, पेण तालुक्यात चर्चा होत आहे. किरण हरि फुलारी, चंद्रकांत वामन डंगर, दिनेश नारायण गावंड व रामचंद्र खंडू गावंड आदी तरुणांनी हा उपक्रम सुरू करण्यासाठी योगदान दिले आहे. त्यांच्या जोडीला गावातील इतर तरुण मंडळीदेखील आहे. आणि समस्त गावकऱ्यांची त्यांना साथ आहे.

> दैनंदिन आयुष्यातील चिंता व ताण या उपक्रमामुळे कमी होऊ लागला आहे. गावातील समस्या सोडविण्यावर येथे चर्चा होते. गावच्या विकासकामांवर बोलले जाते. शिवाय प्रबोधनालादेखील चालना मिळते आहे. त्यामुळे गावात सकारात्मक बदल घडून येत आहे. – समाधान रामा म्हात्रे, तरुण, दुरशेत

असे सुचले?

लोक समूह एकत्र येण्याचे कीर्तन हेच माध्यम आहे. त्यामुळे कीर्तनच्या या उपक्रमांमधून आपल्याला प्रबोधन साधता येईल या हेतूने गावातील तरुणांनी एकत्र येऊन हा नवीन प्रयोग सुरू केला. आणि तो यशस्वीसुद्धा झाला आहे.

विशेष बदल

कीर्तन हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. गावातील लोक या हरि कीर्तनाचा आनंद घेत आहेत. त्यामुळे गावात एक प्रकारची चांगली सकारात्मक ऊर्जा निर्माण होत आहे. कीर्तनाकडे नाक मुरडणाऱ्या तरुणांचा कीर्तनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. विविध क्षेत्रात काम करणारे तरुण शारीरिक व मानसिकदृष्ट्या प्रसन्न झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या कौटुंबिक व व्यावसायिक जीवनाचे योग्य व्यवस्थापन होत आहे. कीर्तनासाठी लोक एकत्र येत असल्याने गावातील समस्यांवर चर्चा होऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न होतात. शिवाय, नवीन योजनादेखील आखल्या जातात.

नि व ड क

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते शिवसेनेत

महाड : देशमुख कांबळे ग्रामपंचायतीमध्ये १ कोटी २८ लाख रुपये मंजूर असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे कामाचा आ. भरत गोगावले यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच सुरेंद्र भोसले यांच्यासह राष्ट्रवादीच्या मंगेश कळमकर, दिलीप सुर्वे, शैलेश भोसले, नरेंद्र भोसले, भगवान वाघे, जितेंद्र भोसले, साहिल भोसले इत्यादींनी शिवसेनेत प्रवेश केला.

नळ योजनेचा शुभारंभ

महाड : महाड तालुक्यातील नडगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये आ. भरत गोगावले यांच्या प्रयत्नाने मंजूर करून आणण्यात आलेल्या ३ कोटी ६ लक्ष रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा नडगाव येथे दि. १ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सर्व सदस्य उपस्थित होते.

वृक्ष सर्वेक्षण लवकरच

नवी मुंबई : महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व कामांतर्गत शहरात वृक्ष छाटणी, धोकादायक वृक्षांचे सर्वेक्षण या कामांना सुरुवात होत असते. लवकरच शहरातील धोकादायक वृक्षांच्या सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपायुक्त नितीन नार्वेकर यांनी दिली. मागील वर्षी १४२ वृक्ष धोकादायक म्हणून घोषित करण्यात आले होते. मेअखेरपर्यंत वृक्ष छाटणी पूर्ण झाली होती. या अनुषंगाने या महिन्यातच धोकादायक वृक्ष सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात येईल, असेही नितीन नार्वेकर यांनी सांगितले.

'पथदिवे बसविण्यात यावेत'

अलिबाग : अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्यावरील कुरुळ गावाच्या पुढील गिरोबा मंदिर ते बेलकडे फाटा यादरम्यानच्या रस्त्यावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य निर्माण होत आहे. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. तरी, संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष घालून या ठिकाणी पथदिवे बसवून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी नागरिकांसह वाहनचालकांमधून होत आहे.

'गतिरोधकांवर सफेद पट्टे मारा'

अलिबाग : अलिबागपासून रेवदंडापर्यंत मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी असणाऱ्या गतिरोधकांवर सफेद पट्टे मारावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, ठिकठिकाणी असणारे गतिरोधक सफेद पट्टे नसल्याने दिसून येत नाहीत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शालेय परीक्षा संपल्याने पुढील दोन महिने या रस्त्यावरुन पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ वाढणार आहे. त्यामुळे पुढील अनर्थ लक्षात घेऊन संबंधित विभागाने गतिरोधकांवर पट्टे मारण्याची मागणी होत आहे.

चार गावांना दूषित पाणीपुरवठा

नागरिकांचे आरोग्य धोक्यात; गॅस्ट्रोची लागण होण्याची शक्यता

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील मेंदडी, तुरुंबाडी, वारळ, काळसुरी या चार गावांना काही दिवसांपासून दुर्गंधीयुक्त दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, गॅस्ट्रोची लागण होण्याची शक्यता बळावली आहे. संबंधित विभागाला याबाबत निवेदन देण्यात आले असून, तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, वरील गावांना मेंदडी, जिल्हा परिषद पाझर तलावातून स्वतंत्र योजनेद्वारे पाझर तलावाच्या खाली असलेल्या विहिरीतून पंपाद्वारे साठवण टाकीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. तलावातील पाणीसाठा कमी झाल्याने पाण्यातील जलपर्णी वनस्पती आणि चिखलामुळे पाण्याला वास आणि रंग येत असल्याचे समजते. या परिसरातील वारळ, तुरूंबाडी या गावांत २०१२ साली ग्रॅस्टोची लागण झाली होती.

तलावात असणाऱ्या जलपर्णी, जलकुंभी, परदेशी लव्हाळ्यांच्या विविध जाती, वनस्पती बरोबर काही कीटकांचे जैविक आक्रमण होते तसेच जलप्रदूषणामुळे आरोग्यावर घातक परिणाम होत असतात, त्यात पाण्यातील गढूळ पाणीसुध्दा एक भाग असू शकतो, तर अनेकदा स्वच्छ व नितळ दिसणाऱ्या पाण्यामध्येही अंतर्गत दूषित स्त्रोतामुळे पाण्यातील प्रदूषण वाढते. त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. या सर्व गोष्टींचे परिणाम वेळीच लक्षात घ्यायला हवेत. यामुळे पाणीटंचाई काळात तालुक्यातील आमदार, तहसीलदार, गटविकास अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता यांच्या समन्वयांतून तालुका पाणीटंचाई आराखडा बनविण्यात येतो. त्या अभ्यासामुळे वारळमधील नागरिक शकील साटविलकर आणि सुनित सावंत यांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता यांना निवेदन आणि दूषीत पाण्याचे नमुने दिले आहेत. ग्रामस्थांनी शासनाकडे तात्काळ वारळसाठी शुद्ध पाणी पुरवठा व्हावा, अशी विनंती केली आहे.

प्रशासकीय स्थिती दोलायमान

वारळ येथील ग्रामस्थ दूषित पाण्याचे नमुने घेऊन कार्यालयात आले असता, त्यांनी मार्च माहिना असल्याने निवेदन टपालात, तर पाणी नमुने तपासणीला असे स्पष्ट सांगितले. गटविकास अधिकारी यांच्याकडे पेणचा चार्ज, पाणीपुरवठा अधिकारी यांच्याकडे रोह्याचा चार्ज असल्याने तिन्ही निवेदने संबंधितांना पोहोचेपर्यंत जिल्हाधिकारी रायगड यांनी टँकरने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी पुढे येत आहे.

जोगेश्वरी मातेचा सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा

शांतता समितीच्या बैठकीत पोलिसांच्या सूचना

। नागोठणे । प्रतिनिधी ।

श्री जोगेश्वरी मातेचा पालखी उत्सव हा सर्व ग्रामस्थांचा आनंदाचा सोहळा आहे. त्यामुळे ग्रामदेवतेच्या या पालखी सोहळ्यास कोणतेही गालबोट लागू नये व पालखी सोहळा विनासायास, निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी ग्रामस्थांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. यासाठी सर्वांनी काळजी घेण्याची व सूचनांचे पालन करण्याची गरज आहे. त्यामुळेच पालखी सोहळ्यात संपूर्णपणे बंदी घालण्यात आलेला डिजे, लाऊड स्पीकर वाजविण्यासह पालखी अडविल्यास कारवाईचा बडगा उगारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नागोठण्याचे पोलीस निरीक्षक राजन जगताप यांनी शांतता समितीच्या बैठकीत दिला.

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या ७ एप्रिलला होणाऱ्याचैत्रोत्सवपालखीसोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात ३१ मार्चला सायंकाळी आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत उत्सव समिती, ग्रामस्थ व पत्रकारांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाई टके, माजी सरपंच विलास चौलकर, जोगेश्वरी माता उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, सचिव मंगेश कामथे, खजिनदार प्रथमेश काळे, ग्रा.पं. सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, राजेश पिंपळे, राजा गुरव, जगदीश चौलकर, शंकर भालेकर, मनोज वाघमारे, नारायण तेलंगे, प्रणव रावकर, संतोष पाटील, नरेश भंडारी, केतन भोय, किरण काळे, प्रमोद नागोठणेकर, राजू नाकती, पो. हे.कॉ. विनोद पाटील आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

विद्युत मंडळाचे दोन विभाग करा

तळा तालुक्यातील नागरिकांची मागणी

। तळा । वार्ताहर ।

ग्राहकांच्या वीजसमस्या दूर व्हाव्यात यासाठी विद्युत मंडळाचे दोन विभाग करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तळा तालुक्यातील निर्मिती २६ जून १९९९ ला झाली. मात्र, तळा तालुका हा डोंगरी व दुर्गम असल्याने ६७ महसुली गावे आहेत. ही गावे दूरदूरवरती डोंगराळ भागात गावे आहेत. महागाव, तळेगाव, मांदाड, तळा असे मोठे विभाग आहेत. तालुक्यात विद्युत मंडळाचे १३ हजार ग्राहक आहेत. तरी विद्युत मंडळांनी या ग्राहकांचा विचार करता दोन विभाग करून एक तळा शहर विद्युत मंडळ विभाग शाखा व दुसरा मांदाड विद्युत मंडळ शाखा विभाग असे दोन विभाग करावेत. त्यामध्ये ६५०० असे दोन विभागात ग्राहक विभागावेत, अशी अपेक्षा नागरिकांतून होताना दिसत आहे.

सध्या तालुक्यासाठी तळा शहरात एकच शाखा असून, मांदाड विभागात नवीन सेक्शन शाखा होण्याची मागणी होत आहे. तळा सेक्शन शाखेत एकूण १४कर्मचारी लाईनमन, अभियंते, कंत्राटी

कामगार असे कार्यरत आहेत. डोंगराळ भाग असल्याने गावागावांमधील अंतर अधिक आहे. या गावांमध्ये विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना पावसाळ्यात एखाद्या गावांचा विद्युत पुरवठा खंडित झाला अथवा डीपीची समस्या झाल्यास तात्काळ पोहाचण्यास वेळ लागतो. अशा विविध समस्या ग्राहक व कर्मचारी यांना येत असतात. पूर्ण तालुक्यासाठी एकच (सेक्शन) शाखा असल्याने कर्मचाऱ्यांकडे अधिकचा भार पडून मोठ्या विभागाला तोंड द्यावे लागते. तसेच ग्राहकांनाही एखादी समस्या आली तर तळा येथे यावे लागते. त्यामुळे आणखी एक (सेक्शन) शाखा वाढवावी आणि ती मांदाड विभागात शक्यतो व्हावी, अशी अपेक्षा जनतेतून केली जात आहे. त्याचबरोबर दोन (सेक्शन) शाखा विद्युत मंडळाच्या तळा तालुक्यात व्हाव्यात, असा प्रस्तावही २०१४-१५ मध्ये पाठविण्यात आल्याचे समजते, तरी विद्युत मंडळाने दोन सेक्शन तालुक्यात सुरू करावेत, अशी मागणी होत आहे.

कामाच्या ठिकाणी, शाळा, कॉलेजात लवकर पोहोचता यावे, यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात उतरणारे प्रवासी नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी रेल्वे प्रशासनाने बांधून दिलेल्या पुलाचा वापर न करता रेल्वे रुळावर जीवघेणा प्रवास करीत आहे. वर्षानुवर्षे हीच परिस्थिती आहे. परंतु, अचानक रेल्वे आली तर मोठा अनर्थ होऊ शकतो, याचे भान प्रवाशांना असणे गरजेचे आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

गोरेगावच्या भैरवनाथ यात्रोत्सव अध्यक्षपदी भारत गोरेगावकर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

दक्षिण रायगड जिल्ह्यात संपन्न होणाऱ्या यात्रांपैकी ऐतिहासिक महत्त्व व सर्वधर्मीय समभावाचे प्रतिक म्हणून ओळख असलेल्या गोरेगाव येथील भैरवनाथ महाराज यात्रोत्सवाच्या अध्यक्षपदी पत्रकार भारत गोरेगावकर यांची बिनविरोध निवड केली आहे. यावर्षी तिथीनुसार मंगळवार, दि. ४ एप्रिल रोजी ही यात्रा संपन्न होणार आहे. मुंबई, पुणे, ठाणेसह राज्याच्या इतर भागात असणारे भाविक, चाकरमानी या यात्रेसाठी आवर्जून उपस्थित राहतात. यंदा लाट सोमवार, दि ३ एप्रिल रोजी मांघरूल गावातून आणण्यात येणार असून, मंगळवार दि ४ एप्रिल रोजी यात्रात्सोव संपन्न होणार आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **औषधाच्या गोडाऊनमध्ये कामासाठी** मुले, मुली पाहिजेत. पात्रता- १० वी ते १२ वी संगणकाचे ज्ञान असलेले चालतील, युनायटेड डिस्ट्रीब्युटर्स, विद्यानगर रेवस रोड, मंगलमुर्ती टाईल्सच्या शेजारी अलिबाग मो नं. : ७४९८६२९९३१/९५१८ ३५३७४१/८४४६४६८९८६.
- **मुलांना सांभाळणे व** घरकामासाठी बाई हवी आहे. पत्ता- विद्यानगर, अलिबाग. संपर्क:-९८६७२१५४९५
- **ऑनेस्ट ग्रुप ऑफ हॉटेल, बार्शिव अलिबाग येथे** रेस्टॉरंट वेटर, ऑल राऊंडर शेफ नेमणे आहेत. राहणे व जेवणाची उत्तम सोय होईल. संपर्क : ९४०५७५४९१९/९६०४७९४७८९
- **वायशेत येथे मुख्य रस्त्यानजीक** (आदित्य इलेक्ट्रीकल समोर) २ गुंठे प्लॉट, लाईट, पाणी,वॉल कंपाऊंड,शेड सहीत भाड्याने देणे आहे. संपर्क :- ७०४५३६६६५२/९१६७०६११३०
- **WE ARE HIRING -Civil Engineer** Requirements- Experienced/ Fresher, Good Communication skills, Fluency in English, Marathi and Hindi, Email drafting Skills, Team management Skills Contact - 7447406705 Jog Infrastructures pvt.Ltd., Sadhana Near Ram Mandir, Brahmin Ali, Alibag, 402201 Jog Infrastructures pvt.Ltd.
- **Vacancies for office staff for** Office in Alibag Graduate candidate can call for Interview between 11 am to 6 pm 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

मुरुडकरांना हापूस आंब्याची आतुरता

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

मार्च महिना संपला तरी अद्याप मुरूडच्या मार्केटमध्ये मुबलक प्रमाणात हापूस आंबे विक्रीस आलेले दिसून येत नाहीत. वाशी मार्केटमध्ये देवगड हापूस केव्हाच दाखल झाला तरी भाव चढे असल्याने व्यापारी येथे आंबे पेट्या विक्रीस आणताना दिसून येत नाही. मुरूड मार्केटमध्ये आंबे येण्याची अनेकजण वाट पाहात आहेत. अजूनही बाजारात कैऱ्याच जास्त प्रमाणात दिसत आहेत. यंदा विचित्र अवकाळी हवामानामुळे आंबा मोहोर काळा पडून गळल्याने जेमतेम ४० टक्केच आंबा मुरूडच्या बाजारात येईल, असे अनुमान शेतकरी मंडळींनी व्यक्त केले आहे.

यंदा आंब्यांचा मोहोर मोठ्या प्रमाणावर बहरला होता. त्यामुळे आंब्याची चव मार्च महिन्यात चाखायला मिळेल, असे मुरुडकरांना वाटत होते. परंतु अवकाळी पावसामुळे चित्र पालटले. अचानक अवकाळी पाऊस, कडक उन्हाळा, थंडी, पुन्हा उन्हाळा या विचित्र हवामानामुळे मोहोरलेल्या आंबा काळा पडून गळला, अशी माहिती वाणदे गावातील शेतकरी तुकाराम पाटील यांनी बोलताना दिली. त्यामुळे

शिल्लक राहिलेला आंबा उशिराने मुरूड मार्केटमध्ये येईल आणि हा आंबा ३० ते ४० टक्केच असेल, असे मत तुकाराम पाटील यांनी व्यक्त केले.

मुरूड भाजी मार्केटमधील व्यापारी

■ हवामान बदलाचा बागायतदारांना फटका

■ मोहोर जळाल्याने ४० टक्केच आंबा शिल्लक

सुभाष सदानंद कासेकर यांचे दुकानात छोट्या आकारातील काही हापूस आंबे विक्रीस आले होते. यांचा डझनाचा दर रु ६००/- होता. कासेकर म्हणाले की, यंदा मोठ्या प्रमाणात आंबा अजूनही विक्रीस आलेला नाही. गेल्या वर्षी या वेळेत आंबा स्थानिक मार्केटमध्ये आलेला होता. सध्या रायवळी, पायरी, नीलम या जातीचे आंबेदेखील आलेले नसल्याचे दिसून आले.

मुरूड मार्केटमध्ये शिघ्रे ते खारआंबोली तसेच मुरूडपासून ३० कि.मी. अंतरावरील साळाव येथील परिसरातील काही महिला भगिनी छोट्या आकारातील मोजकेच आंबे काही दिवसांपासून टोपलीतून विक्रीस आणत असून, ५०० ते ६०० डझनाने विक्री करताना दिसत आहेत. स्थानिक पेटी पॅक आंबे येथे दिसून आलेले नाहीत.

ही तर लोकशाहीची पायमल्ली : डॉ. शेख

। म्हसळा । वार्ताहर ।

उद्योगपती अदानी समूहातील शेल कंपन्याची २० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपच्या मोदी सरकारला धारेवर धरल्यामुळे मोदी सरकारने सूडबुद्धीने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करून लोकशाहीची पायमल्ली केली असून, देशभरातील काँग्रेस पक्ष मोदी सरकारचा निषेध करीत असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे राज्य प्रतिनिधी डॉ. मुईज शेख यांनी सांतिगतले. काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

येत्या १५ एप्रिल ते २० एप्रिल २०२३ दरम्यान जिल्हा स्तरावर 'जय भारत सत्याग्रह' हे आंदोलन घेण्यात येणार असल्याचे जिल्हा काँग्रेस चे सरचिटणीस सुफियान हालडे यांनीही सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रतिनिधी डॉ. मुईज शेख, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सुफियान हलडे, शहर काँग्रेस अध्यक्ष आशफाक काठेवाडी, म्हसळा शहर युवक अध्यक्ष माजीद सुभेदार, शहर काँग्रेस अध्यक्षा नाजिमा मुकादम, शहर पर्यावरण सेल अध्यक्ष येजाज घरटकर, सुहेल फकिह, सुजाउद्दीन काजी, बशीर दोंदीलकर, जलील काजी आदि मान्यवर उपस्थित होते.

उद्या वढाव येथे बहिरीदेवाचा यात्रा महोत्सव

पेणच्या यात्रोत्सवाला शुभारंभ

। पेण । प्रतिनिधी ।

पेण-वढाव ता. पेण येथील श्री बहिरी देवस्थानाची यात्रा चैत्र शुध्द त्रयोदशी मंगळवार, दि. ४ एप्रिल रोजी होत आहे. मंगळवारी ४ एप्रिलला बहिरीदेवाचा छबिना दुपारी बारा वाजता ढोलाच्या गजरात बहिरी देवाची गाणी म्हणत छबिना निघतो. बहिरी देवाच्या सोबत पाठीवर व पायावर पेरकुटे (निवडुंग) भाविक भक्तजन मारतात. पाठ व पायाच्या पोटऱ्या यांतून रक्त निघून ते भळभळा वाहते. भक्तजनांच्या पाठीवर त्यावेळी हळद टाकली जाते. पाठीवर पेरकुटाचे रुतलेले काटे नंतर एक ते दोन दिवसांनी पाठीतून आपोआप बाहेर निघतात. हे या यात्रेचे वैशिष्ट्य आहे.

बहिरीदेव मोठेवढाववरून वढाव येथे राधाकृष्णाच्या देवळाजवळ आल्यावर शर्यतीच्या हेलकोटी (देवकाठ्या) उभारल्या जातात. या काठ्या उंच अशा कळकीच्या बांबूपासून बनविलेले असतात. त्यातून १ ते ३ क्रमांक काढले जातात. त्यानंतर ढोल वाजवायाच्या एक चाल व दोन चाल या चालीच्या ढोलाच्या वाजवायाच्या स्पर्धा होऊन विजेत्यास बक्षीस दिले जाते. या बहिरीदेवाचा विशेष म्हणजे ही मूर्त ८० वर्षांपूर्वी एका अखंड लाकडाची असून, त्या लाकडाचा घोडा व घोड्यावर स्वार झालेला बहिरीदेव अशी ही लाकडाची मूर्त असून, एवढी वर्ष आतापर्यंत होत आली तरी या मूर्तीस भंग झाला नाही अथवा तडा गेलेली नाही. बहिरी पाच दिवस देवळाबाहेर ठेवून सतत चार दिवस ढोलावर तालात गाणी म्हटली जाऊन जागरण केले जाते. नंतर पाचव्या दिवशी सकाळी अभिषेक करून सकाळी नऊ वाजता बहिरीदेव त्याच्या सिंहासनावर ठेवला जातो. बहिरीदेवाची यात्रा झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी खारेपाटातील मानाची यात्रा म्हणजे आई जगदंबे वाशीची यात्रा असते.

पेणमधील प्रसिध्द यात्रा

मंगळवार ०४ एप्रिल वढाव येथील

काळभैरव देवाची यात्रा, बुधवार ०५ एप्रिल वाशी येथील वरसूबाय जगदंबा भवानी देवीची यात्रा, गुरूवार ०६ एप्रिल बोरी आक्कादेवीची यात्रा, नवघर, गडब येथील, ०८ एप्रिल वरेडी येथील काळभैरव देवाची यात्रा, शनिवार २० एप्रिल रावे गावच्या आई रायबादेवीची यात्रा, शनिवार २२ एप्रिल जिते गावची सत्यनारायण देवाची यात्रा.

‘त्या’ रस्त्याचे काम २२ एप्रिलपर्यंत जैसे थे

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील वन ट्री परिसरातील कच हाऊस ते गुलिस्तान बंगला या भागातील रस्त्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने माथेरानमधील क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे २२ एप्रिलपर्यंत जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले असल्याने त्या रस्त्यावर आणखी काही दिवस कोणतेही काम केले जाणार नाही.

माथेरान नगरपरिषदेकडून शहरातील कच हाऊस ते गुलिस्तान बंगला या भागातील रस्त्याचे काम २०२२ मध्ये मंजूर करण्यात आले होते. त्या लाल मातीच्या रस्त्याचे धूळ विरहित रस्त्यात रूपांतर करण्याच्या कामाचे कार्यादेश पालिकेने संबंधित कामाची निविदा भरणाऱ्या ठेकेदाराला दिले आहेत. या लाल मातीच्या रस्त्याचे धूळ विरहित रस्त्यावर रूपांतर करण्याचे काम सुरू झाल्यानंतर आक्षेप आल्याने थांबविण्यात आले होते. त्या हरकतीस स्थानिक नागरिक आणि रहिवाशी यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागत बंदी उठविण्याची मागणी केली होती. त्यावेळी २२ फेब्रुवारी रोजी रायगड अप्पर जिल्हाधिकारी यांनी प्रसंगी पोलीस बंदोबस्त घेवून रस्त्याचे काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्याच दिवशी २२ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने आपल्याकडे दाखल झालेल्या पीटिशन वर निर्णय देताना माथेरान मधील क्ले पेव्हर ब्लॉकची सर्व कामे दोन महिने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सध्यातरी माथेरान शहरातील वन तरी परिसरातील कच हाऊस ते गुलिस्तान बंगला या रस्त्याचे धूळ विरहित रस्त्यात रूपांतर करण्याचे काम सुरू झालेले नाही.

सर्वोच्च न्यायालयातील निर्णयाला २२ एप्रिल रोजी दोन महिने पूर्ण होणार असल्याने कदाचित त्यानंतर या रस्त्याचे थांबलेले काम पूर्ण सुरू होऊ शकते. त्यामुळे त्यासाठी २२ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालय आपल्याकडून देण्यात येणाऱ्या निर्णयाची वाट स्थानिक रहिवाशी यांना पहावी लागणार आहे.

याच काळात माथेरानमध्ये चालविली गेलेली ई रिक्षा यांच्याबाबत देखील अहवाल सनियंत्रण समिती कडून सर्वोच्च न्यायालयात सादर होणार असल्याने या दोन्ही निर्णयाकडे माथेरानकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

दिवेआगरमध्ये यात्रोत्सव

। दिघी । वार्ताहर ।

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिध्द पर्यटन स्थळ दिवेआगर येथे चैत्र शु. चतुर्दशी व पौर्णिमेला श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ यात्रेची लगबग मोठ्या उत्साहात सुरू आहे. यावर्षी एप्रिलच्या ४ व ५ तारखेला दोन दिवशी यात्रोत्सव साजरा होत आहे. पुणे, मुंबई प्रमाणे अनेक शहरानजीकचे पर्यटन स्थळ म्हणून दिवेआगरला खास पसंती दिली जाते. यात्रा उत्सवात पंचक्रोशीतील भक्तजन व पर्यटकांची आवर्जून गर्दी असते. त्यामुळे येथील श्रद्धेने होणारी ‘गळी फिरणे’ व ‘हाथकोडे’ यात्रेतील वैशिष्ट्ये ठरत असतात.

या उत्सवात दोन दिवस दिवेआगर गावामधील घरोघरी श्री भैरवनाथाची परडी फिरते. सालाबादप्रमाणे गावातील मंडळीकडून मानपान दिला जाते. गावातील प्रमुख उत्सव असल्याने दर्शनासाठी गर्दी उसळते. आपली मनोकामना पूर्ण होण्यास भक्तांकडून देवाला साकडे घातलं जाते. हाथकोडेच्या परंपरेनुसार मंदिराच्या आवारात खेळलं जाते. यानंतर पुढे या यात्रेचे आकर्षण ठरते ते गळी फिरणे त्यामुळे यात्रोत्सवातील अशा क्षणाची उत्सुकता भक्तगणात आहे.

नेरळ कळंब रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरु

। नेरळ । वार्ताहर ।

तालुक्यातील माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळ कळंब भागातील अत्यंत खराब असलेल्या भागातील रस्त्याचे काँक्रिटकरण करण्यात सुरुवात झाली आहे. माथेरान नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्ता खोपोली कर्जत मुरबाड शहापूर या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याला जाऊन मिळत असल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी महत्वाचा समजला जातो. या रस्त्यावर कोल्हारे ग्रामपंचायत मधील साई मंदिरापासून धामोतेपर्यंत असलेला रस्ता खोलगट असल्याने पावसाळ्यात पाणी साठत असते. त्यामुळे स्थानिक वाहनचालक हे पावसाळ्यात रस्त्यावरून वाहत जाणाऱ्या पाण्यामुळे अडकून पडायचे आणि त्यामुळे स्थानिकांनी या भागातील रस्त्याचे आरसीसी काँक्रिट करावे अशी मागणी केली जात होती.

शेवटी माथेरान नेरळ कळंब रस्त्यावरील धामोते धनेश्वरी मंदिर ते विद्या भवन शाळा या भागातील रस्त्यावरील रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून निधी मंजूर केला आहे. त्यामुळे आता धनेश्वरी मंदिर पुढील भागातील रस्त्याचे काँक्रिटकरण करण्याचे काम मार्च २०२३ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आले आहे.

> रस्त्याच्या खाली असलेली जमीन ही पाणी असलेली जमीन असून त्या चिकट प्रकारच्या जमिनीवर असलेला रस्ता हा पावसाळ्यात कायम खराब होत असतो. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे पडण्याचे प्रकार सतत होत असतात. त्यामुळे या भागातील रस्त्यावर डांबरीकरण ऐवजी काँक्रिटीकरण करण्यात येत आहे.
>
> **-संजीव वानखेडे**
> सार्वजनिक बांधकाम विभाग उप अभियंता

वाघ्रणला साई भंडारा संपन्न

। वाघ्रण । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील साई मंदिराच्या वतीने साईप्रेम मित्र मंडळ वाघ्रण खारपेढांबेतर्फे रामनवमी निमित्त २५ व्या भंडारा आयोजित करण्यात आला होता. याउत्सवानिमित्त मंदिर परीसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. यावेळी महिलांचे हळदी कुंकु, श्री नवनाथ भजन प्रासादिक मंडळ रोहा यांच्या भजनाचा कार्यक्रम पार पडला. शेतकरी कामगार पक्ष महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आ. पंडित पाटील, भावना पाटील व युवराज पाटील यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. याप्रसंगी रोहीत पाटील, प्रथमेश म्हात्रे, दिपक पाटील, अनोज पाटील, जितेद्र धोदरे, शारदा पाटील, सुरेखा पाटील, प्रितम म्हात्रे, राजेंद्र पाटील, साईप्रेम मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकारी, आचारी ग्रुप, लक्ष्मीकांत डेकोरेटस, नितीन साऊंड सर्व्हीस, आदींचा सत्कार परमेश माळी यांच्या हस्ते करण्यात आला.

वाढत्या इंधन चोरीमुळे नागरिक हैराण

। उरण । वार्ताहर ।

डिझेल पेट्रोलचे भाव वाढल्याने डिझेल व पेट्रोलची उरणमध्ये मोठ्या प्रमाणात चोरी सुरु झाली आहे. गव्हाण फाटा हद्दीपासून ते जेएनपीटी परिसरात डिझेल, पेट्रोल चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहेत. उरण तालुक्यात दिघोडे, जाभूळपाडा, चिर्ले, धुत्रूम, द्रोणागिरी नोड आदी परिसरात व आजूबाजूच्या गावाजवळ चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. २१ फेब्रुवारी २७ फेब्रुवारी तसेच ७ मार्च रोजी NH ३४८ या राष्ट्रीय महामार्गावर टाटा नेक्सॉन (ग्रीन कलर), होन्डा डब्लू आर व्ही (रेड कलर), हुंदाई एकसेंट (व्हाईट कलर) चे नंबर प्लेट नसलेले या फोर व्हीलर वाहनाद्वारे डिझेल व पेट्रोलची चोरी करण्यात आली आहे. तर अनेक ठिकाणी उभ्या असलेल्या मोठ्या आईलच्या गाड्यातून पेट्रोल, डिझेलच्या गाड्यातून पाईप लाईनद्वारे मोठ्या प्रमाणात पेट्रोल, डिझेलची चोरी सुरु आहे. असे प्रकार उरणमध्ये सर्रासपणे सुरु आहेत. महाराष्ट्र ढाबा, विरग्रो यार्ड, आर आर लॉजिस्टिक, वैश्वी सी. एफ एस, एल.पी.यार्ड, पंजाब कंपनी, एच.पी.पेट्रोल पंपाच्या रोडवर फेब्रुवारी २०२३ व मार्च महिन्यातही नंबर प्लेट नसलेल्या वाहनातून डिझेल पेट्रोलची चोरी झालेली आहे. एका दिवसाला लाखो रुपये हे चोर कमवत आहेत. त्यामुळे कर्तव्यदक्ष व प्रामाणिक पोलीस अधिकारी असलेले नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी या प्रकरणात लक्ष घालून या प्रकरणाचा छडा लावावा, अशी मागणी आता जनतेतून केली जाऊ लागली आहे

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू

। पनवेल । वार्ताहर ।

मोटरसायकलवरून घरी जात असताना वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी असलेल्या इसमाचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला आहे. प्रदीप साळवी (वय ४२) असे या मयत इसमाचे नाव असून ते खारघरमधील स्वप्नपूर्ती बिल्डिंगमध्ये पत्नी व दोन मुलांसह राहत होते. प्रदीप यांनी स्वप्नपूर्ती बिल्डिंगमध्ये करुणा एंटरप्रायजेस या नावाने रिअल इस्टेटचे कार्यालय सुरू केले होते. त्यासाठीचे बॅनर बनवण्यासाठी साळवी पत्नीसह खारघर सेक्टर- ३५ मध्ये गेले होते. या ठिकाणी जात असताना त्यांचा वाहनाच्या धडकेत अपघात झाला होता.

लॅपटॉपची चोरी करणारी टोळी सक्रीय

। पनवेल । वार्ताहर ।

गाडीच्या काचा फोडून आतमध्ये असलेला लॅपटॉप चोरुन नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून पनवेल शहरात उभ्या करून ठेवलेल्या दोन वाहनांच्या गाडीच्या काचा फोडून अज्ञात चोरट्यांनी लॅपटॉप चोरुन नेले आहेत.

राजन गुप्ता यांनी त्यांची गाडी मुनुत इंम्प्रेस बिल्डींगच्या पाठीमागील मोकळ्या जागेत उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या गाडीची काच फोडून ५ हजार रुपये किंमतीचा एचपी कंपनीचा लॅपटॉप चोरुन नेला आहे. तर त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ उभ्या करून ठेवलेल्या गाडीची सुद्धा काच फोडून महागडा लॅपटॉप अज्ञात चोरट्याने चोरुन नेला आहे. गेल्या काही दिवसापासून पनवेल शहरासह कळंबोली आदी परिसरात अशा प्रकारे लॅपटॉप चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. तरी वाहन मालकांनी गाडीमध्ये लॅपटॉप, कॅमेरे, मोबाईल फोन किंवा इतर मौल्यवान ऐवज गाडीत ठेवून बाहेर जावू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे

उरणमध्ये स्वच्छतेची शपथ

। उरण । वार्ताहर ।

उरण स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ अंतर्गत स्वच्छता शपथ व स्वच्छता रॅली शुक्रवारी (ता. ३१) दुपारी १२.३० वाजता काढण्यात होती. ही रॅली उरण नगरपालिका येथून सुरू करण्यात आली. रॅली सुरू होण्याआधी नगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ अंतर्गत उरण नगरपालिका सी.ओ.मा. अनिल जगदाने यांनी नगरपालिका सभागृहात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामुदायिक प्रतिज्ञा घेतली. महाराष्ट्र माझा आहे. माझा महाराष्ट्र स्वच्छ ठेवणे माझे प्रथम कर्तव्य आहे. मी कचराकुंडीचा वापर करीन. सुका, ओला कचरा वेगळा करीन. सार्वजनिक ठिकाणी थुंकणार नाही. माझे घर, माझा परिसर, विभाग, कार्यस्थळ स्वच्छ ठेवेन. प्लास्टिक पिशवी मागणार नाही, अशी शपथ घेतली. त्यानंतर उरण नगरपालिका येथून रॅली काढली. उरण नगरपालिका ते नगराजशेठ चौक ते जुना फुल मार्केट मार्गे गांधी चौक ते राजपाल नाक्यावरून विमला तलाव गार्डन येथून रॅली काढण्यात आली. नगरपालिका कर्मचारी हातात फलक घेऊन नागरिकांना स्वच्छतेबाबत जागृत करत होते. कार्यक्रमासाठी सायली म्हात्रे, अनिल जगदाने, सुरेश तांडेल, सचिन भानुसे, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘जल्लोष सुवर्ण युगाचा’ कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

। चिरनेर । वार्ताहर ।

चिरनेर येथील पी.पी खारपाटील कन्स्ट्रक्शन अँड कंपनी आणि पी.पी खारपाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ऐतिहासिक चिरनेर गावात रामनवमीच्या निमित्ताने स्टेप आर्ट डान्स अकॅडमीच्या जल्लोष सुवर्ण युगाचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्टेप आर्ट डान्स अकॅडमीच्या कलाकारांनी आपली कला सादर करून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

दरम्यान, उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांचेही या कार्यक्रमात पाय थिरकले. याप्रसंगी चिरनेरगाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, कंपनीच्या सुनिता खारपाटील, प्रफुल्ल म्हात्रे, शशांक ठाकूर, संतोष म्हात्रे, नितीन नारंगीकर, बळीराम फोफेरकर, विश्वास मोकल, अमोल जाधव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन नितेश पंडित व राजेंद्र भगत यांनी केले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीची विद्यमान मालक सौ. हर्षला संतोष पाटील, रा. नवी मुंबई हिचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे - घोटवडे, ता. सुधागड, जि. रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर	आकार रु.पैसे
१६२	३ ब	०-९८-८०	१२.४८
	पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-२२-००		

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीची मालकाने हिने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०३/०४/२०२३

सही/-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक नय्यर शमशुल इस्लाम यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रु.पै.
३४	३	०-०७-९०	०-०३
३९	३/ब	०-१८-००	०-९५
४०	१	०-१४-७०	२-१९
४०	५	०-१०-००	१-५०

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०४/२०२३

ॲड. सी.बी. ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड- ४१०२०१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

ग्रामपंचायत दिव
ता. पेण, जि. रायगड
टेंडर नोटीस

ग्रामपंचायत दिव कडून (जनसुविधा) योजनेअंतर्गत व पंचायत समिती सेस फंड सन २०२२-२३ अंतर्गत खालीलप्रमाणे कामांसाठी रजिस्टेशन ठेकेदार यांजकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम	सादर करण्याचा कालावधी	निविदा उघडण्याची तारीख
१.	ग्रुप ग्रामपंचायत दिव अशोक ठाकूर ते ठाकूर तलावापर्यंत अंतर्गत रस्ता तयार करणे. (प.स. सेस फंड)	१,५०,०००	१ टक्के	०३ एप्रिल ते १० एप्रिल २०२३	११ एप्रिल २०२३ सकाळी ११ वाजता
२	नारवेल अंतर्गत रस्ता तयार करणे. (जनसुविधा)	३,००,०००	१ टक्के	-,,-	-,,-
३	राम मुर्लीधर म्हात्रे ते दत्त मंदिर मलेघर वाडीकडे जाणारा रस्ता तयार करणे. (जनसुविधा)	३,००,०००	१ टक्के	-,,-	-,,-

१) अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.
२) कामाचे मुल्यांकन पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडील अभियंताकडून केले जाईल व त्याचप्रमाणे ग्रामपंचायती कडील उपलब्ध निधीनुसार रक्कम अदा केली जाईल.
३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सर्वस्वी मा.सरपंच यांस असेल.
४) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदारास रु.१०० चे बाँडपेपर दोन जमिनदार देवून करारनामा स्व.खुशीने करून द्यावयाचा आहे.

ग्रामसेवक अधिकारी
ग्रामपंचायत दिव
ता.पेण, जि. रायगड

सरपंच
ग्रामपंचायत दिव,
ता.पेण, जि.रायगड

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडकोमार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकास कामे टप्पा-१ हाती घेण्यात आलेली असून त्यात नवी मुंबई विमानतळाअंतर्गत असलेल्या उलवे टेकडीच्या सपाटीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर काम करताना विमानतळ गाभा क्षेत्रातील उलवे टेकडीहून उपलब्ध होणारा दगड/मुरुम काही प्रमाणात लगतच्या सखल भागात टाकण्यात येत आहे. प्राथमिक अंदाजानुसार, सुमारे ०२,२०,६९७. ६० मेट्रीक टन एवढा दगड/मुरुम साठा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळांतर्गत गाभा क्षेत्राबाहेरील सर्व्हे नं. ४२,४३ आणि ६३,ओवळे गांव येथे उपलब्ध आहे. सदर साठा सिडकोमार्फत खालील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून जागेवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१. यशस्वी निविदाकारास सदर दगड/मुरुम साठा उचलण्यापूर्वी प्रचलित दराने स्वामित्वधनाची रक्कम जिल्हाधिकारी, रायगड/उपविभागीय अधिकारी/तहसिलदार,पनवेल यांच्याकडे अदा करावी लागेल.
२. सदर दगड/मुरुम साठा घेऊन जाण्यापूर्वी यशस्वी निविदाकारास सिडकोकडे अधिमूल्याचा भरणा करणे आवश्यक राहील. तसेच स्वामित्वधनाची रक्कम स्वतंत्ररित्या सदर साठा घेऊन जाण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणास अदा करावी लागेल.
३. सदर दगड/मुरुम साठ्याचे वजन करण्यासाठी वजनकाटा सिडकोमार्फत जवळच्या चालू असलेल्या कामांमधून प्रभारी अभियंत्यानी निदेर्शित केल्याप्रमाणे देण्यात येईल.
४. सदर कामाचा कालावधी इरादापत्र/कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून ०२ महिन्यापर्यत असेल.
५. सदर कामासाठी स्फोट करण्याची आवश्यकता नाही.
६. यशस्वी निविदाकारास सदर दगड/मुरुम साठा उचलणे तसेच वाहून नेण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री तैनात करावी लागेल.

या जाहीर निविदेमार्फत सर्व कंत्राटदार, विकासक, क्रशर मालक, खाणमालक व इतर संबंधितांना सूचित करण्यात येते की, इच्छुक अर्जदारांनी आपल्या निविदा ऑफलाईन पध्दतीने बंद लिफाफ्यामध्ये आपल्या लेटरहेडवर कार्यकारी अभियंता (विमानतळ-६) यांच्या कार्यालयात स्वामित्वधन व इतर कर वगळून सिडकोकडे भरणा/अदा करावयाच्या उद्धृत अधिमूल्य (Quoted Premium) प्रती मेट्रीक टन या स्वरुपात दि. १२.०४.२०२३ रोजी ११:०० ते १३:०० या वेळेत सादर कराव्यात.सीलबंद निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ अभिप्रेत निविदाकारांना निविदा प्राप्त झाल्यानंतर योग्यरित्या सूचित केली जाईल. सदर काम सर्वाधिक उद्धृत अधिमूल्य (Quoted Premium) असणाऱ्या निविदाकारास प्रदान करण्यात येईल.

या निविदेसंदर्भातील मुद्दे ठरविणे, ते राबविणे अथवा रद्द करणे यासंबंधीचे सर्व अधिकार सिडको प्रशासनाकडे राखीव राहतील.

अधिक माहितीसाठी **कार्यकारी अभियंता (विमानतळ-६), तिसरा मजला, टॉवर नं. १०, सी.बी.डी. बेलापूर रेल्वे स्टेशन, नवी मुंबई** यांच्याशी किंवा भ्रमणध्वनी क्र. ९८६९५ ०१९०२ वर किंवा **ee.ap6@cidcoindia.com** या ई-मेलवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

अधिक्षक अभियंता
(विमानतळ)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/००५/२०२३-२४

निवडक

सिंधूचा अंतिम फेरीत प्रवेश

माद्रिद : भारताच्या पी व्ही सिंधूने यंदाच्या हंगामातील पहिल्या अंतिम फेरीत प्रवेश केला. माद्रिद मास्टर्स बॅडिमटन स्पर्धेत सिंधूने सिंगापूरच्या येओ जिया मिनचे आव्हान मोडून काढले. उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत विजयाचे पारडे सातत्याने झुकताना दिसत होते. अनोळखी खेळाडूंविरुद्धची सिंधूची अपयशी मालिका कायम राहणार का अशी भीती एक वेळ दिसत असतानाच सिंधूने जियाचे आव्हान परतवून लावले.

प्रीतीला आशियाईचे वेध

नवी दिल्ली : जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी केल्यानंतर प्रीती यादवचे लक्ष्य निश्चितच ऑलिम्पिक खेळण्याचे असले, तरी त्यापूर्वी प्रीतीला आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान मिळवायचे आहे. पॅरिस ऑलिम्पिकसाठी आशियाई क्रीडा स्पर्धा ही पहिली पात्रता फेरी असल्यामुळे आधी आपल्याला आशियाई स्पर्धेत खेळायचे असून त्यामध्ये असेच यश संपादित करु असे बॉक्सर प्रिती यादव म्हणाली.

भोजपुरीतून समालोचन

मुंबई : इंडियन प्रीमियर लीगच्या १६व्या हंगामाला सुरुवात झाली आहे. यावेळी समालोचनात प्रथमच भोजपुरी वापरण्यात येत आहे. यापूर्वी आयपीएलचे समालोचन फक्त ६ भाषांमध्ये केली जात होते परंतु सध्या या लीगच्या सामन्यांची लाइव्ह कॉमेंट्री १२ भाषांमध्ये केली जात आहे. चाहत्यांना जिओ सिनेमावर वेगवेगळ्या फ्लेवर्स मिळत आहेत ज्यात भोजपुरी देखील आहे. त्याचा प्रेक्षक आनंद घेत आहेत.

उमेश यादवचा विक्रम

अहमदाबाद : आयपीएल पंजाब विरुद्ध कोलकात्ता या सामन्यात उमेश यादव याने डेवेन ब्राव्हो आणि सुनील नारायण यांचा विक्रम मोडीत काढला. एकाच संघाविरोधात सर्वाधिक विकेट घेण्याचा रेकॉर्ड आता उमेश यादवच्या नावावर जमा झाला आहे. उमेश यादव याने आयपीएलमध्ये पंजाबविरोधात ३४ विकेट घेण्याचा पराक्रम केलाय. याआधी हा विक्रम ब्राव्हो आणि सुनील नारायणच्या नावावर होता.

रैनाचे हल्लेखोर ठार

मुंबई : उत्तरप्रदेश पोलिसांनी मुजफ्फरनगरमधील शाहपूर परिसरात कुख्यात गुंड राशिदला चकमकीत ठार केलं आहे. राशिदच्या डोक्यावर १४ ते १५ गुन्ह्यांची नोंद आहे. तसेच भारताचा माजी क्रिकेटपटू सुरेश रैना याच्या तीन नातेवाईकांच्या खुनाच्या प्रकरणात तो मुख्य आरोपी होता. राशिदने रैना याचे काका काकी आणि चुलत भावाची हत्या केली होती. यामुळे पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले.

आयपीएलला भरु लागला रंग

लखनऊचा पहिला विजय

। लखनऊ । वृत्तसंस्था ।

लखनऊ सुपरजायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्समध्ये आयपीएल २०२३ मधील तिसरा सामना लखनऊमध्ये खेळवण्यात आला. या सामन्यात के एल राहुलच्या लखनऊ संघाने ५० धावांनी थरारक विजय मिळवला. लखनऊच्या या विजयाचा खरा हिरो ठरला म्हणजे. मार्क वुड. या गोलंदाजाच्या दमदार खेळीमुळेच लखनऊने आपल्या घरच्या मैदानात पहिला विजय मिळवला.

मार्क वुडने ४ षटकांत ५ बळी घेतले. यादरम्यान त्याने केवळ १४ धावा केल्या. अशाप्रकारे मार्क वूड आयपीएल २०२३ मधील ५ बळी घेणारा पहिला गोलंदाज बनला आहे. या सामन्यात पृथ्वी शॉ मार्क वुडचा पहिला बळी ठरला. पाचव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर वुडने पृथ्वीला त्रिफळाचित केले. यानंतर पुढच्याच चेंडूवर त्याने मिचेल मार्शला पॅव्हेलियनमध्ये धाडले. जेव्हा तो त्याच्या दुसऱ्या षटकासाठी आला तेव्हा त्याने सर्फराज खानला सातव्या षटकात बाद केले. २० व्या षटकात त्याने अक्षर पटेल आणि चेतन साकारियाचा बळी घेत खळबळ उडवून दिली. अशाप्रकारे लखनऊने दिलेल्या १९४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली संघाला ९ गडी बाद १४३ धावाच करता आल्या.

मार्क वुड हा आयपीएलमध्ये ५ बळी घेणारा इंग्लंडचा दुसरा गोलंदाज ठरला आहे. सुमारे ११ वर्षांपूर्वी इंग्लिश गोलंदाज दिमित्री मास्कारेन्हासने हा पराक्रम केला होता. आयपीएलमध्ये ५ बळी घेणारा तो इंग्लंडचा पहिला गोलंदाज ठरला. दिमित्रीने २०१२ मध्ये मोहालीत पुणे वॉरियर्सविरुद्ध पीबीकेएससाठी २५ धावा देत ५ बळी घेतले. दिमित्रीने वुडपेक्षा जास्त धावा दिल्या होत्या.

मार्क वुडचे पाच बळी

यासह वुड आयपीएलच्या इतिहासात एका डावात सर्वोत्तम गोलंदाजी करणारा जगातील आठवा गोलंदाज ठरला. यामध्ये अल्झारी जोसेफचे नाव अव्वल स्थानावर आहे. ३.४ षटकांत केवळ १२ धावा देत ६ बळी घेतले. विशेष म्हणजे मार्क वुडने अद्याप टी-२० आंतरराष्ट्रीय किंवा टी-२० मध्ये ५ बळी घेतलेल्या नाहीत. त्यांना पहिल्यांदाच ५ बळी चटकावल्या आहेत.

मार्क वुडने यापूर्वी सीएसकेसाठी फक्त एकच हंगाम खेळला होता. ज्यामध्ये त्याने एका सामन्यात ४९ धावा दिल्या. यामध्ये त्याला एकही विकेट मिळवता आली नाही.

पावसाच्या व्यत्ययाने पंजाबची कोलकातावर मात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मोहालीत ब्रिंद्रा स्टेडियमवर पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना झाला. पावसाने खोडा घातल्याने डकवर्थ लुईसच्या नियमानुसार पंजाबचा ७ धावांनी विजय झाला.

कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात फलंदाजीसाठी उतरलेल्या पंजाब किंग्जने कोलकाताच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवत २० षटकांत ५ विकेट्स गमावत १९१ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजांनी सर्वस्व पणाला लावलं. कोलकाताने १६ षटकांत सात विकेट्स गमावत १४६ धावा केल्या होत्या. विजयासठी कोलकाताना ४ षटकांत २४ धावांची गरज होती. परंतु आंद्रे रसेल आणि व्येंकटेश अय्यरने आक्रमक खेळी केली. परंतु, धावांचं लक्ष्य गाठताना कोलकाताच्या फलंदाजांची दमछाक झाली. कारण अर्शदीप सिंगने गोलंदाजीचा भेदक मारा करून कोलकाताच्या तीन फलंदाजांना बाद केले. पंजाबने दिलेलं १९२ धावांचं लक्ष्य गाठण्यासाठी कोलकाताचे सलामीवीर फलंदाज मनदीप सिंग आणि रहमानउल्ला गुरबाज मैदानात उतरले होते. गुरबाजने सुरुवातीच्या काही षटकांत मोठे फटके मारत कोलकाताच्या

धावसंख्येचा आलेख चढता ठेवला. पण मनदीपला धावांचा सूर गवसला नाही. अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर मनदीप अवघ्या दोन धावांवर बाद झाला. त्यानंतर गुरबाजला नॅथन एलिसने २२ धवांवर क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर आंद्रे रसेलने चौफेक फटकेबाजी करत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीनं १९ चेंडूत ३५ धावा कुटल्या. पण सॅम करनाच्या गोलंदाजीवर रसेल झेलबाद झाला. त्यानंतर अय्यर अर्शदीपच्या गोलंदाजीवर ३४ धावांवर बाद झाला.गुरुबाज बाद होताच कोलकाताचा फलंदाज अनुकुल रॉय फक्त ४ धावांवर असताना अर्शदीपच्या गोलंदाजीचा शिकार झाला अन् तंबूत माघारी परतला. कोलकाताचे टॉप ऑर्डरचे फलंदाज स्वस्तात माघारी परतल्यानंतर कर्णधार नितीश राणाने सावध खेळी केली. पण नितीश १७ चेंडूत २४ धावांवर खेळत असताना सिकंदर रझाच्या गोलंदाजीवर बाद झाला. नितीशच्या पाठोपाठ रिंकू सिंगही बाद झाला आणि कोलकाताला पाचवा धक्का बसला.

पंजाब किंग्जसाठी सलामीला मैदानात उतरलेल्या प्रभसिमरन सिंगने सुरुवातीच्या षटकांमध्ये चौफेर फटकेबाजी केली. सिंगने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १२ चेंडूत २३ धावांची खेळी केली. परंतु, टीम साऊदीने सिंगला २३ धावांवर असताना झेलबाद केलं आणि पंजाबला पहिला धक्का दिला. पण त्यानंतर भानुका राजपक्षेने आक्रमक खेळी करत पॉवर प्ले मध्ये पंजाबला ५० धावांपर्यंत पोहोचवलं. त्यानंतरही भानुकाने मोठे फटके मारत ३२ चेंडूत ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. मात्र, उमेश यादवच्या गोलंदाजीवर राजपक्षे ५० धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर शिखर धवन आणि जितेश शर्माने पंजाबची कमान सांभाळली. जितेश शर्माला पंजाब किंग्जसाठी मोठी खेळी करता आली नाही. जितेश ११ चेंडूंचा सामना करत २१ धावांवर खेळत असताना टीम साऊदीने त्याला झेलबाद केलं. त्यानंतर शिखरने डाव सावरण्याचा प्रयत्न केला पण शिखरलाही अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असताना वरुण चक्रवर्तीने ४० धावांवर बाद केलं आणि कोलकाताची बाजी उलटवली.त्यानंतर पंजाबच्या सिकंदर रजा आणि सॅम करनने सावध खेळी केली.

सह्याद्री कर्जत संघ आमदार चषकाचा मानकरी

। शिहू । वार्ताहर ।

दत्तवाडी क्रीडा मंडळ सांबरी आयोजित माजी आ. पंडित पाटील चषकाचे आयोजन कै. यशवंत गोमा पाटील क्रीडासंकुलनात भव्य दिव्य आदिवासी कब्बड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या कबड्डी स्पर्धेत द्वितीय क्रमांक गावदेवी धानकान्हे, तृतीय क्रमांक तडवागळे संघ, चतुर्थ क्रमांक श्री. गणेश कोलघर संघाने पटकवला. विजयी संघाना आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन पंडित पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना त्यांनी देशातील विविध राज्यात खेळल्या जाणाऱ्या कबड्डी खेळाची महाराष्ट्रात एक वेगळी ओळख आहे. या अस्सल मैदानी व मर्दानी खेळाचे जतन व्हावे, कबड्डीला गत वैभव प्राप्त व्हावे तसेच रायगडच्या मातीतून राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय खेळाडू उदयास यावे हे या सामन्यांच्या मागचे उद्दिष्ट

असल्याचे उपस्थित खेळाडूंना सांगितले.

या कार्यक्रमासाठी कुर्डुस माजी सरपंच संदीप पाटील, सुनील पिंगळे, संजू पाटील, विकास पाटील, सीताराम पाटील, सुनील म्हात्रे, संतोष म्हात्रे, सारिखा पाटील, वनिता शेळके, धनु नाईक मंगेश नाईक, मुरलीधर पाटील, बाबुराव नाईक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आंबिवली कबड्डी स्पर्धेचा झाप संघ विजयी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

सुधागड तालुका कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्री वाघेश्वर क्रीडा मंडळ आंबिवली यांच्या वंतीने तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत तालुक्यातील नामवंत १६ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अंतिम लढत नाथभैरव झाप विरुद्ध वरदायिनी राबगाव या दोन संघात झाली. मात्र या स्पर्धेत झाप हा संघ

विजयी होऊन अंतिम विजयी होण्याचा मान पटकावला.

या संघास रोख रक्कम ११ हजार १११ रु व आकर्षक चषक,तर उपविजेता पदाचा मानकरी वरदायिनी राबगाव हा संघ ठरला. या संघास रोख रक्कम ७ हजार ७७७ रु व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक भैरिनाथ नागशेत संघास रोख रक्कम ५ हजार ५५५ रु व आकर्षक चषक,चतुर्थ क्रमाक जय हनुमान जांभूळपाडा या संघास रोख रक्कम ५ हजार ५५५ रु व आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू प्रेम कुडपाने (झाप) उत्कृष्ट चढाई मयुरेश पोंगडे (नागशेत) उत्कृष्ट पक्कड राज भोईर (राबगाव), पब्लिक हिरो ज्ञानेश्वर साजेकर (जांभूळपाडा) या खेळाडूंना आकर्षक पदक देऊन गौरविण्यात आले.

मिडलाईन कर्जत विजेता, चौडेश्वरी कडसुरे उपविजेता

। नागोठणे । वार्ताहर ।

सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान आयोजित भव्य आमदार चषक कबड्डी स्पर्धेत कर्जतच्या मिडलाईन संघाने विजेतेपद तर कडसुरेच्या चौंडेश्वरी संघाने उपविजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मिडलाईन कर्जत संघाने चौडेश्वरी कडसुरे संघाचा पराभव करून प्रथम क्रमांकाचे रु. ३३ हजार, ३३३ च्या रोख बक्षिसासह भव्य अशा आमदार चषकावर आपले नाव कोरले. तर कडसुरे संघाला द्वितीय क्रमांकाचे रु. २२ हजार,

२२२ व चषकावर सामाधान मानावे लागले. तर ज्ञानेश्वर कोलवे व नवतरुण कारावी या संघांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकाचे प्रत्येकी ११ हजार, १११ रुपयांचे पारितोषिक व चषक मिळविला. तसेच वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट खेळाडू म्हणून कर्जतचा धीरज बैलमारे याला एल.ई.डी.टीव्ही, उत्कृष्ट चढाईसाठी कडसुरेचा निखील शिर्के याला कुलर, उत्कृष्ट पकडीसाठी कोलवे संघाचा प्रतिक म्हात्रे याला सायकल तर पब्लिक हिरो म्हणून कारवी संघाचा राज पाटील याला मिनी फ्रीज देऊन आ. अनिकेत तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तत्पूर्वी या स्पर्धेचे उद्घाटन खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बापदेव वाणी संघाने अमर ओवली संघाचा पराभव केला. तर दुसऱ्या सामन्यात गावदेवी पाटणसई संघाने गोल्डन रेड मध्ये अमर ओवली संघाचा पराभव केला. परी या छोट्या मुलीने सादर केलेली शिवगर्जनाही लक्षवेधी ठरली. रोहा येथील शैलेश साळुंखे यांच्या साई डान्स अकॅडमीच्या बाल कलाकारांनी मने जिंकली.

सलीम दुर्रानी कालवश

। जामनगर । वृत्तसंस्था।

भारताचे माजी क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. ते कर्करोगाशी झुंज देत होते. गुजरातमधील जामनगरमध्ये सलीम यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. अर्जुन पुरस्काराने सन्मानित होणारे ते

पहिले क्रिकेटपटू होते. हा सन्मान त्यांना १९६० मध्ये मिळाला होता. सलीम दुर्रानी यांनी भारतासाठी २९ कसोटी खेळल्या, ज्यात त्यांनी एक शतक आणि सात अर्धशतकांच्या मदतीने १२०२ धावा केल्या. तसेच ७५ विकेट्स घेतल्या.

सलीमने १९६० मध्ये मुंबई कसोटीतून पदार्पण केले होते. तो षटकार मारण्यासाठी जास्त प्रसिद्ध आहे. सलीमने शेवटची कसोटी फेब्रुवारी १९७३ मध्ये इंग्लंडविरुद्ध मुंबईत खेळली होती. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर सलीमने चित्रपटसृष्टीतही काम केले. त्याने चरित्र या बॉलिवूड चित्रपटातही काम केले आहे. या चित्रपटात सलीमसोबत परवीन बाबी होती. सलीम दुर्रानी यांच्या निधनाबद्दल क्रिकेट जगताशी निगडित अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या काळातील भारताचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू मानला जाणारे सलीम दुर्रानी यांच्याबद्दल असे म्हटले जाते की, ते प्रेक्षकांच्या मागणीवरून षटकार मारायचे. क्रिकेटविश्वातील मान्यवरांनी सलीम यांना आदरांजली वाहिली आहे.

अभिनव कबड्डी स्पर्धेत

शिवगर्जना, आकांक्षा मंडळ अंतिम विजेते

। मुंबई । प्रतिनिधी ।

अभिनव स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या पुरुष तृतीय श्रेणी (स्थानिक) गटात शिवगर्जना मंडळाने, तर कुमार गटात आकांक्षा मंडळाने जेतेपद पटकाविले. माटुंगा पूर्व येथील नप्पू लखमशी मनोरंजन मैदानावर झालेल्या तृतीय श्रेणी गटाच्या अंतिम सामन्यात शिवगर्जना मंडळाने गुरुमाऊली स्पोर्ट्सचा ३०-१९ असा पराभव करीत अंतिम विजेतेपद मिळविले.

पहिल्या डावात एकमेकांचा अंदाज घेत सावध सुरुवात करणाऱ्या दोन्ही संघाची ११-११ अशी बरोबरी होती. दुसऱ्या डावात मात्र शिवगर्जनाने

आपला खेळ अधिक गतिमान करीत ११ गुणांच्या फरकाने आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. रवी खोत याच्या सावध व संयमी चढाया, तर मंगेश धुमाळचा भक्कम बचाव यामुळे हा विजय शक्य झाला. गुरुप्रसाद धामणे, दिनेश धामणे यांचा खेळ गुरुमाऊलीचा पराभव टाळण्यात कमी पडला.

कुमारांच्या अंतिम सामन्यात आकांक्षा मंडळाने अमर संदेश मंडळावर ३१-१८ अशी सहज मात करीत अंतिम विजेतेपदाला गवसणी घातली. पहिल्या सत्रात १७-१० अशी आघाडी घेणाऱ्या आकांक्षाने दुसऱ्या सत्रात देखील सावध खेळ करीत हा विजय साकारला. लवेश चिंबडे, स्वप्नील पवार यांच्या संयमी चढाया आणि उत्कर्ष पयर यांच्या आकर्षक पकडी यामुळे हा विजय शक्य झाला. अमर संदेशचे अतिश जयस्वार, सर्वेश पाल चमकले. या स्पर्धेचे बक्षिस वितरण नगरसेवक अमय घोले, पहिल्या महिला शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त चित्र नाबर-केरकर, मुंबई शहर कबड्डी असो. चे संयुक्त चिटणीस शरद कालांगण यांच्या उपस्थितीत पार पडला.

पनवेलमध्ये प्रीमियर लीग

। पनवेल । प्रतिनिधी।

आयपीएल टी-२० च्या धर्तीवर पनवेलमध्ये प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्षनेते आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांच्या पुढाकाराने श्रेया स्पोर्ट्स कोपर कै.नितीन नाईक स्मृती आयोजित ग.च.च पनवेल प्रिमियर लिगचे आयोजन कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, पनवेल येथे दि.१९ मार्च २०२३ ते १ एप्रिल २०२३ दरम्यान करण्यात आले होते.स्पर्धेचे उद्घाटन प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते झाले. वेगवेगळ्या दहा संघांनी या लीगमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा अंतिम सामना श्री समर्थ करंजाडे व नितीन स्मृती श्रेया स्पोर्टस कोपर या दोन्ही संघांमध्ये रंगला. यात श्री समर्थ करंजाडे संघाने प्रथम क्रमांक २,००,००० पारितोषिक आणि चषक पटकावले. चेतन म्हात्रे, विपुल म्हात्रे यांच्या हस्ते विजयी संघाचे सत्कार करण्यात आले. बक्षीस समारंभाच्या वेळी गणेश कडू, राजेश हातमोडे, डॉ. संतोष जाधव, नंदराज मूंगाजी, मंगेश शेलार, सतीश म्हात्रे उपस्थित होते. सदर सामन्यादरम्यान उद्योजक मुकुंद म्हात्रे, किरण खानावकर, संजय पाटील, पी. डी. भोईर, मयूर भोईर, दयाल पवार, शशिकांत भोईर, संतोष दमडे, राकेश गायकवाड, संतोष पाटील, सचिन घरत, अजयशेठ पाटील, अनुज जितेकर, गजानन पाटील, समीर म्हात्रे, मिथुन पाटील, दत्ता मुंगाजी, रतन खरोल, अविनाश नाईक, जिगर करावकर, आदित्य प्रिया, दिनेश गायकवाड, दिनेश शेलार, हेमंत दरे आणि क्रिकेट रसिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)